# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १३३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.२१ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## शेतकऱ्यांसाठी २५ टक्के पेट्रोल पंप राखीव करा, अन्यथा सरकारी वाहनं फिरु देणार नाही, शरद पवार गटाचा इशारा


जळगाव दि.२० (प्रतिनिधी)- राज्यातील अनेक भागात इंधनाचा तुटवडा भासत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणच्या पेट्रोल पंपावर रांगा लागल्या आहेत. जळगाव जिल्ह्यात देखील काही भागात इंधनाचा तुटवडा भासत आहे. याच मुद्यावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष आक्रमक झाला आहे. पुढील २४ तासात सरकारने शेतकऱ्यांसाठी २५ टक्के पेट्रोल पंप राखीव न केल्यास, कोणतेही सरकारी वाहन रस्त्यावर फिरु देणार नाही असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीने आज जळगावमध्ये देण्यात आला आहे.


सध्या पेट्रोल पंपावर डिझेल मिळत नसल्याने, शेतकऱ्यांच्या शेत जमिनी तयार करताना मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. येत्या पंधरा दिवसात जर शेतकऱ्यांच्या जमिनी तयार होऊ शकल्या नाहीत तर पेरण्या करण्यास अडचणी निर्माण होऊन, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणीत वाढ होणार आहे. त्यामुळं तातडीने शेतकऱ्यांसाठी सरकारने डिझेल पंप राखीव करण्यात यावे अशी मागणी केली आहे. मात्र, सरकारने असा निर्णय घेतला नाही तर मात्र कोणतेही वाहन रस्त्यावर फिरू देणार नाही,असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

# राज्यात इंधन टंचाईचे भीषण वास्तव, बळीराजा रडकुंडीला; अनेक ठिकाणी पेट्रोल पंप कोरडे ठाक

**मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- राज्यातील प्रमुख शहरांमध्ये पेट्रोल डिझेल इंधनाची मोठ्या प्रमाणात टंचाई सुरु असल्याचे विदारक चित्र पाहायला मिळत आहे. खरीपाचा हंगाम अगदी तोंडावर आला असून या इंधन टंचाईच्या झळा प्रामुख्याने शेतकरी वर्गाला जास्तीच्या बसल असल्याचे दिसून येते. अनेक ठिकाणच्या पेट्रोल पंपावर पेट्रोल डिझेलसाठी लांबच लांब रांगा लागल्या आहेत. शेतीच्या कामासाठी ट्रॅक्टरची आवश्यकता असल्याने डिझेल हा पर्याय उभाठाकला आहे. ऐनवेळी डिझेल मिळत नसल्याने वाहनधारक, शेतकरी कॅन डब्बे घेऊन पेट्रोल पंपावर रांगा लावत असल्याचे दिसुन येते. पेट्रोल डिझेल मिळत नसल्याने सर्वसामान्य जण संतप्त झाले आहेत. बऱ्याच ठिकाणचे पेट्रोल पंप कोरडे ठाक पडल्याचे जाणवत असून सर्वच पेट्रोल पंपावर विदारक चित्र दिसत आहे. मात्र अशातच सरकार पातळीवर राज्यात इंधनाचा मुबलक साठा असल्याचे म्हटले जाते. असे असेल तर टंचाई का? हा प्रश्न उपस्थित केला जात असून परिस्थिती अशीच राहीली तर पुढील काळात जनतेच्या संतापाचा उद्रेक होईल अशी भिती व्यक्त केली जात आहे.**

## इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध, मग रांगा कशासाठी?







अस्मानी संकटामुळे राज्यातील शेतकरी आधीच कर्जात बुडालेला आहे. निसर्गाच्या लहरीपणानं आधीच हैराण झालेला बळीराजा आता पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या नव्या संकटामुळे पुरता हतबल झाला आहे. राज्यात अनेक भागात डिझेल मिळत नसल्यानं ट्रॅक्टर बंद पडलेत. ज्याच्याकडे डिझेल इंजिननं पाणीउपसा होतो त्यांना आता पिकांना पाणी देता येत नाहीये. तर शेतमाल बाजारात नेण्यासाठीही शेतकऱ्यांची फरफट सुरू आहे. सरकारच्या नियोजनाच्या अभावाचा सर्वात मोठा फटका पुन्हा एकदा बळीराजालाच बसतोय. अशातच राज्यातील अनेक जिल्ह्यातील पेट्रोल पंपावर सध्या इंधन टंचाईच भयावह वास्तव समोर आलं असून आता नागरिकांच्या संतापाचाही कडेलोट होण्याची शक्यता आहे.

बुलढाणा जिल्ह्यात आज (२० मे) सातव्या दिवशीही इंधन टंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. जिल्ह्यातील १६६ पेट्रोल पंपांपैकी निम्म्याहून अधिक पेट्रोल पंपावर डिझेल उपलब्ध नसल्याने शेतकरी ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीच्या मशागतीची कामे करू शकत नसल्याचे चित्र आहे. मान्सून तोंडावर असताना शेतकऱ्यांची कामे खोळंबल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. तर इंधन टंचाईमुळे रस्ते वाहतुकीवरही परिणाम झाला असून जवळपास पंधरा ते वीस टक्के रस्ते वाहतूक कमी झाल्याचं समोर येत आहे. जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर रात्रभर शेतकरी व वाहनधारकांच्या रांगा बघायला मिळाल्या. मात्र बुलढाणा जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा असून साठेबाजीमुळे इंधन टंचाई निर्माण झाल्याचा प्रशासनाचा दावा आहे. तर भाव वाढ होऊनही वीस ते पंचवीस टक्के इंधन विक्री वाढल्याचं प्रशासनाने म्हटले आहे.

परभणीत सलग चौथ्या दिवशी डिझेल टंचाई कायम आहे. शहरातील केवळ २ पंपावर डिझेल उपलब्ध आहे. जिथे डिझेल मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकीकडे कॅन घेवून पहाटेपासून रांगेत उभे आहेत. तर दुसरीकडे जवळपास २ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा या पंपावर लागल्या आहेत.

आखाती देशातील युद्धाचा परिणाम आता भंडाऱ्यातील शेतकऱ्यांनाही बसू लागला आहे. भंडाऱ्याच्या लाखांदूर तालुक्यातील अनेक पेट्रोल पंपवर 'नो स्टॉक'चा बोर्ड बघायला मिळत असून विरली येथील एकमेव पेट्रोल पंपवर डिझेल आणि पेट्रोलचा पुरवठा सुरू आहे. वाशिममध्ये सलग सहाव्या दिवशी डीझल मिळत नसल्याचे चित्र आहे. डीझल नाही अशे फलक लागल्याने शेतकऱ्यांना आणि वाहनचालकांना रिकाम्या हातांनी परतण्याची वेळ येतंय

हिंगोली जिल्ह्यांमध्ये डिझेलचा तुटवडा कायम असून जिल्ह्यातल्या अनेक पेट्रोल पंपवर डिझेलचा ठणठणाट झाल्याचा पहायला मिळत आहे. त्यामुळे अनेक पेट्रोल पंपवर डिझेलसाठी शेतकरी आणि वाहन चालकांची झुंबड उडाल्याचे पाहायला मिळालं होतं. हिंगोली जिल्ह्यातल्या अनेक पेट्रोल पंपवर मध्यरात्रीपर्यंत डिझेलसाठी वाहनांच्या शेतकऱ्यांच्या रंगात बाहेर निघाल्या होत्या. आज तरी हे चित्र बदलल असे, अपेक्षा होती. मात्र आजही डिझेलची टंचाई कायम असल्याचे पाहायला मिळते आहे. इंधन टंचाईच्या झळा राज्यातील विविध विभागाच्या शहरात प्रामुख्याने जाणवत असून भविष्यात ही परिस्थिती तातडीने हाताळायची गरज निर्माण झाली आहे.

## इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध, जनतेने पॅनिक होऊ नये-फडणवीस

केंद्र सरकारकडे पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे जनतेने विनाकारण घाबरून जाण्याचे (पॅनिक होण्याचे) कारण नाही. जेव्हा लोक अफवांवर विश्वास ठेवून गरजेपेक्षा जास्त पेट्रोल भरू लागतात, तेव्हा इंधनाची सप्लाय चेन तात्पुरती विस्कळीत होते. याचा अर्थ साठा संपला असा होत नाही. जागतिक परिस्थिती बिकट असतानाही केंद्र सरकारने आपली पुरवठा साखळी मजबूत ठेवली आहे. त्यामुळे नागरिकांनी इंधनाचा गैरवापर टाळावा आणि अफवांना बळी पडू नये.पोलिस वाहनांना पेट्रोल मिळत नसल्याच्या चर्चेचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी खंडन केले. पोलिसांसाठी सर्व ठिकाणी पुरेशा प्रमाणात पेट्रोल-डिझेल उपलब्ध आहे. नागपूरमध्ये घडलेल्या एका घटनेचा उल्लेख करत ते म्हणाले की, नागपूरमध्ये एका पोलिस कर्मचाऱ्याने पेट्रोल शिल्लक असतानाही अत्यंत चुकीचे उत्तर दिले होते. या बेजबाबदार वर्तनामुळे संबंधित कर्मचाऱ्यावर कडक कारवाई करण्यात आली आहे.

## न्यायालयाला तानाशाह म्हणणाऱ्या युट्यूबरला ६ महिन्यांची शिक्षा

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी काही दिवसांपूर्वी एका वकिलाच्या याचिकेवर सुनावणी करत असताना देशातील काही बेरोजगार तरुण झुरळाप्रमाणे असल्याचे म्हटले होते. हे तरुण सोशल मीडिया आणि माध्यमांच्या चर्चेत व्यवस्थेवर हल्ले करत असतात, अशी टिप्पणी त्यांनी केली होती. या टिप्पणीवर विविध क्षेत्रातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्यानंतर सरन्यायाधीशांनी आपल्या विधानाचा विपर्यास केला, असे म्हटले होते. आता दिल्ली उच्च न्यायालयाचा एक निर्णय चर्चेत आहे. ज्यामध्ये न्यायालयाचा कथित अवमान करणाऱ्या एका युट्यूबरला न्यायालयाने सहा महिन्यांची शिक्षा सुनावणी आहे.

न्यायालयाबद्दल बदनामीकारक विधान केल्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने युट्यूबर गुलशन पाहुजा नामक व्यक्तीला सहा महिन्यांचा कारवास आणि २००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली. न्यायमूर्ती नवीन चावला आणि न्यायमूर्ती रवींद्र दुडेजा यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. जर यापेक्षा कमी शिक्षा दिली तर भविष्यात अशी (पान ४ वर)

## अमेरिकन संसदेत इराण युद्ध थांबवणारा प्रस्ताव मंजूर

### ट्रम्प यांच्या ४ खासदारांनी विरोधात मतदान केले; राष्ट्रपतींकडे अजूनही व्हेटोचा अधिकार

वॉशिंग्टन दि.२० (वृत्तसंस्था)- अमेरिकन संसदेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लष्करी अधिकारांना मर्यादित करणारा प्रस्ताव मंजूर झाला आहे. मतदानात ४ रिपब्लिकन खासदारांनीही विरोधी पक्ष डेमोक्रॅट्सना साथ दिली. ३ रिपब्लिकन खासदार मतदानात सहभागी झाले नाहीत. हा प्रस्ताव ५०-४७ मतांनी मंजूर झाला, मात्र त्याला कायदा बनण्यासाठी अजून काही टप्प्यांतून जावे लागेल. जर हा प्रस्ताव कायदा बनला, तर ट्रम्प सरकारला इराणविरुद्ध युद्ध सुरू ठेवण्यासाठी काँग्रेसची मंजुरी घ्यावी लागेल.

सध्या सिनेटमध्ये यावर अंतिम मतदान होणे बाकी आहे. त्यानंतर त्याला रिपब्लिकन बहुमताच्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह्जकडून मंजुरी घ्यावी लागेल. मात्र, त्यानंतरही ट्रम्प याविरुद्ध व्हेटो करू शकतात. मग तो व्हेटो रद्द करण्यासाठी सिनेट आणि हाऊस दोन्हीमध्ये दोन-तृतीयांश बहुमत लागेल, जे सध्या कठीण मानले जात आहे.

हे मतदान विरोधकांसाठी मोठा विजय मानले जात आहे, जे म्हणत होते की अमेरिकेत युद्ध सुरू करण्याचा किंवा सैन्य पाठवण्याचा अधिकार राष्ट्रपतीकडे नसून संसदेकडे असावा. अमेरिकेच्या संविधानातही हीच व्यवस्था दिली आहे.

हा प्रस्ताव व्हर्जिनियाचे डेमोक्रॅट सिनेटर टिम केन यांनी आणला आहे. चर्चेदरम्यान ते म्हणाले की, आता जेव्हा युद्धविरामाची चर्चा होत आहे, तेव्हा ट्रम्प यांनी संसदेसमोर येऊन आपली रणनीती सांगावी.

डेमोक्रॅट सिनेटर टिम केन म्हणाले की, युद्ध सुरू करण्याचा अधिकार संसदेकडे आहे, केवळ राष्टपतींकडे नाही. तर व्हाईट हाऊसचे म्हणणे आहे की, ट्रम्प यांनी अमेरिकेच्या सुरक्षेसाठी आपल्या अधिकारांनुसार कारवाई केली आहे.

अमेरिकन कायद्यानुसार, कोणताही राष्टपती संसदेच्या मंजुरीशिवाय केवळ ६० दिवसांपर्यंत लष्करी कारवाई करू शकतो. यानंतर एकतर युद्ध संपवावे लागते, काँग्रेसची परवानगी घ्यावी लागते, किंवा सैन्याच्या सुरक्षित माघारीसाठी ३० दिवसांची अतिरिक्त मुदत मागावी लागते. (पान ४ वर)

## अमेरिकेने इराणविरोधातील युद्धात गमावली ४२ लढाऊ विमाने अन् ड्रोन्स

वॉश्गिटन दि.२० (वृत्तसंस्था)- इराणचे हवाई दल, नौदल पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याचा दावा करणाऱ्या अमेरिकेला देखील या संघर्षात मोठा तोटा सहन करावा लागला आहे. इराणविरोधातील संघर्षात अमेरिकेने ४२ विमानं गमावली असून, यात लढाऊ विमानं आणि ड्रोन्सचा देखील समावेश आहे. अमेरिकेने इराणविरुद्ध ऑपरेशन एपिक फ्युरी सुरु केल्यानंतर विमानं गमावली असल्याची माहिती एका अहवालातून समोर आली आहे.

अमेरिका आणि इस्त्रायलने २८ फेब्रुवारी रोजी इराणविरुद्ध लष्करी कारवाई सुरु केली. हल्ल्याच्या पहिल्याच दिवशी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला. प्रत्युत्तरात इराणने देखील अमेरिकाच्या आखाती देशातील तळांवर हल्ले केले. अमेरिकेने इराणच्या लष्कराचे मोठे नुकसान झाल्याचा दावा केला. दरम्यान, या संघर्षात अमेरिकेचे देखील मोठे नुकसान झाल्याचे आता काँग्रेशनल रिसर्च सर्व्हिसच्या अहवालातून समोर आले आहे. या अहवालानुसार अमेरिकेने ४२ विमानं गमावली आहेत. दरम्यान, या संख्येत बदल होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. (पान ४ वर)

## भारताच्या डोक्यावर आर्थिक वादळ घोंघावतय अन् आपले पंतप्रधान चॉकलेट वाटण्यात मश्गुल; राहुल गांधींची बोचरी टीका

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या इटलीच्या दौऱ्यावर आहेत. मंगळवारी रात्री इटलीत दाखल झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी इटलीच्या पीएम जॉर्जिया मेलोनी यांची भेट घेतली. यानंतर या दोघांनी रोम शहरात एक खास फोटोसेशन केले. मोदी-मेलोनींचे हे फोटो सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. तसेच पंतप्रधान मोदी यांनी स्वत:च्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर मेलोनी यांच्यासोबत कोलॅब करत एक व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये पंतप्रधान मोदी हे इटलीच्या पंतप्रधानांना त्यांच्या नावाशी सार्धम्य असलेली मेलेडी चॉकलेटस् देताना दिसत आहेत. या व्हिडीओमध्ये दोघेही खळाळून हसताना पाहायला मिळत आहेत. याच व्हिडीओवरुन काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका केली आहे. देशाच्या डोक्यावर आर्थिक वादळ घोंघावत असताना आपले पंतप्रधान इटलीत चॉकलेटस वाटण्याच मश्गुल आहेत. देशातील शेतकरी, तरुण, महिला, मजूर आणि लहान शेतकरी दु:खात आहेत. दोन महिन्यांपासून देशात बेरोजगारी वाढतेय हे मी सांगतोय, पण माझी खिल्ली उडवली जात आहे. पंतप्रधान मोदी हसत आहेत, रिल्स बनवत आहेत आणि भाजपचे लोक टाळ्या वाजवत आहेत. या नेतृत्व म्हणत नाहीत, ही नौटंकी आहे, असे ट्विट राहुल गांधी यांनी केले आहे.

राहुल गांधी यांनी बुधवारी रायबरेली येथे झालेल्या सभेतही पंतप्रधान मोदी यांच्यावर टीकास्त्र सोडले. आता अदानी आणि अंबानी मोदी देशाला वाचवू शकत नाहीत. आता देशातील शेतकरी, मजूर, तरुण देश वाचवू शकतात, पण यांनी तुमचे हात बांधून टाकले आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्या (पान ४ वर)

## शेतकरी कर्जमाफी ३० जूनपूर्वी होणार, आचारसंहितेचा अडथळा नाही-कृषीमंत्री भरणे

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफीची घोषणा ३० जूनपर्यंत अंमलात येणार आहे. सध्या विधानपरिषद निवडणुकीची घोषणा झाली आहे. त्यासाठीची आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे या काळात शेतकरी कर्जमाफी होणार नाही, अशी शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र, या सर्व चर्चांवर पडदा टाकत कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी मोठी आणि दिलासादायक माहिती दिली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी बिगुल वाजवले आहे. २५ जूनपर्यंत ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. नेमकी याच काळात कर्जमाफीची अंमलबजावणी होणार असल्याने, आचारसंहितेच्या नियमांमुळे ही प्रक्रिया रखडणार का? अशी शंका उपस्थित केली जात होती.

या निर्माण झालेल्या संभ्रमावर बोलताना कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी स्पष्ट केले की, निवडणूक असली तरी कर्जमाफीच्या कामात कोणताही अडथळा येणार नाही. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस योग्य आणि सकारात्मक (पान ४ वर)

## राज्यात १ महिना पुरेल एवढाच इंधन साठा; पुरवठा मंत्री भुजबळ यांची माहिती

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील अनेक पेट्रोल पंप इंधनाअभावी कोरडेठाक पडले आहेत. त्यातच राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी राज्यात केवळ १ महिना पुरेल एवढाच इंधन साठा असल्याचे स्पष्ट केले आहे. यामुळे मध्यपूर्वेतील स्थिती सुधारली नाही तर राज्याला मोठ्या इंधन टंचाईचा सामना करावा लागेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

मध्यपूर्वेत अमेरिका व इस्त्रायलने इराण विरोधात मोर्चेबांधणी केली आहे. सध्या या भागात तणावपूर्ण शांतता आहे. पण होर्मुझची सामुद्रधुणी बंद असल्यामुळे येथून होणारी इंधनाची वाहतूक ठप्प पडली आहे. परिणामी, पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे भारतात इंधन टंचाई निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पेट्रोल पंपांवर इंधनासाठी लोकांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. काही ठिकाणी हाणामारीचेही प्रकार घडलेत. या प्रकरणी विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली असताना मंत्री छगन भुजबळ यांनी उपलब्ध साठ्याची उपरोक्त माहिती दिली आहे.

छगन भुजबळ म्हणाले, सरकारकडे सध्या केवळ १ महिना पुरेल एवढाच पेट्रोल - डिझेलचा साठा उपलब्ध आहे. पेट्रोल - डिझेलची चिंता असली तरी राज्याकडे केरोसिनचा (रॉकेल) मुबलक साठा आहे. पण केरोसीन वाटपाची जी साखळी होती, ती आता पूर्णपणे तुटली आहे. ही परिस्थिती हाताळण्यासाठी व वाटप सुरुळीत करण्यासाठी काही विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेषतः ही पुरवठा साखळी पूर्ववत करण्यासाठी आता केरोसीन वाटपाची विनामूल्य परवानगी दिली जाईल.

भुजबळ म्हणाले, इंधन टंचाईचा प्रश्न हा केवळ मुंबई, महाराष्ट्र किंवा भारतापुरता मर्यादित नाही. हा एक जागतिक प्रश्न बनला आहे. इराण, अमेरिका व इतर देशांमध्ये सुरू असलेला अंतर्गत वाद व राजकीय घडामोडींमुळे (पान ४ वर)

## अशोक खरातला ६ दिवसांची ईडी कोठडी

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- पीएमएलए कोर्टाने आज भोंदू अशोक खरातची ६ दिवसांच्या ईडी कोठडीत रवानगी केली. यावेळी झालेल्या सुनावणीत ईडीच्या वकिलांनी अशोक खरातने पतसंस्थांमधील बोगस खात्यांचा वापर पैशांचे लेअरिंग करण्यासाठी केल्याचा आरोप केला. यावेळी खरातने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. पण अखेर कोर्टाने त्याला ईडीच्या कोठडीत पाठवले.

भोंदू अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. याशिवाय आर्थिक फसवणुकीचेही अनेक आरोप त्याच्यावर आहेत. ईडीने त्याचा ताबा घेतल्यानंतर आज त्याला मुंबई स्थित पीएमएलए कोर्टातपुढे हजर करण्यात आले. यावेळी झालेल्या सुनावणीत ईडीच्या वकिलांनी काही महत्त्वाच्या गोष्टी कोर्टापुढे मांडल्या. ईडीच्या युक्तिवादानुसार, अशोक खरातने समता नागरी क्रेडिट सोसायटीत अनेकांच्या नावाने ६३ खाती उघडली. या सर्व खात्यांना खरातचा नंबर जोडण्यात आला. तसेच या खात्यांचा नॉमिनी म्हणूनही खरातचेच नाव होते. त्याचा लाभार्थीही तोच होता.

या खात्यांचा वापर पैशांचे लेअरिंग करण्यासाठी करण्यात आला. या खात्यांत कोट्यवधींची रक्कम रोकडीत भरण्यात आली आणि काढण्यात आली. एवढे पैसे कुठून (पान ४ वर)

## भारत-इटलीमध्ये २०२९ पर्यंत २२ अब्ज युरोच्या व्यापाराचे लक्ष्य

रोम दि.२० (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्यातील द्विपक्षीय चर्चेनंतर दोन्ही देशांमधील संबंध आता एका नव्या उंचीवर पोहोचले आहेत. रोम येथे झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत पंतप्रधान मोदींनी भारत आणि इटलीने आपल्या संबंधांना 'स्पेशल स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप' (विशेष धोरणात्मक भागीदारी) चा दर्जा दिल्याची घोषणा केली. गेल्या तीन वर्षांतील सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर हा मैलाचा दगड गाठण्यात दोन्ही देशांना यश आले आहे.

पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी भारत आणि इटली दरम्यानचा व्यापार आणखी मजबूत करण्यावर भर दिला. सध्या दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार १४ अब्ज युरो आहे, जो २०२९ पर्यंत २२ अब्ज युरोवर नेण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवण्यात आले आहे. हे लक्ष्य गाठण्यासाठी भारत आणि युरोपीय संघ यांच्यातील प्रस्तावित 'मुक्त व्यापार कराराचा' मोठा फायदा होईल, असा विश्वास मेलोनी यांनी व्यक्त केला. पंतप्रधान मोदींनीही या कराराला पाठिंबा दिल्याबद्दल इटलीचे आभार मानले आणि यामुळे दोन्ही देशांतील



व्यावसायिक समुदायाला मोठा फायदा होईल, असे सांगितले.

दोन्ही देशांमधील सहकार्याला गती देण्यासाठी तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारत आणि इटलीमध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, क्वांटम तंत्रज्ञान, अंतराळ क्षेत्र आणि नागरी अणुऊर्जा क्षेत्रात सहकार्याची मोठी क्षमता आहे. दोन्ही देशांमधील स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योगांना एकत्र आणण्यासाठी 'भारत-इटली इनोव्हेशन सेंटर' स्थापन केले जाईल, अशी महत्त्वाची घोषणा यावेळी करण्यात आली.

सुरक्षा आणि जागतिक शांततेच्या मुद्द्यावर बोलताना पंतप्रधान मोदींनी दहशतवादाचा कडक शब्दांत निषेध केला. "भारत आणि इटली दहशतवादाविरोधात एकत्र उभे आहेत. दहशतवादाला होणाऱ्या आर्थिक पुरवठ्याविरोधातील आपल्या संयुक्त मोहिमेने जगासमोर एक आदर्श ठेवला आहे.

जबाबदार लोकशाही देश केवळ दहशतवादाचा निषेध करत नाहीत, तर त्यांचे नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी ठोस पावले उचलतात, हा संदेश आम्ही दिला आहे," असे मोदींनी ठामपणे सांगितले. युक्रेन आणि पश्चिम आशियातील तणावावर बोलताना पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले की, सर्व वाद हे चर्चा आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातूनच सोडवले पाहिजेत, या भूमिकेवर भारत ठाम आहे.

पंतप्रधान मोदी आपल्या ५ देशांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात मंगळवारी रात्री रोमला पोहोचले. तिथे त्यांचे लष्करी इतमामात औपचारिक स्वागत करण्यात आले. या यशस्वी चर्चेनंतर पंतप्रधान मोदींनी जॉर्जिया मेलोनी यांना भारत भेटीचे आमंत्रणही दिले आहे. या दौऱ्यामुळे भारत आणि इटलीच्या मैत्रीचा एक नवा सुवर्णकाळ सुरू झाला आहे.

## राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा विषय संपलाय-शशिकांत शिंदे

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची आज महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला मात्र आमदार रोहित पवार यांनी पाठ फिरवल्याचे पाहायला मिळाले. शरद पवारांनी अजित पवार गटातील सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांची काही दिवसांपूर्वी स्तुती केली होती, त्यामुळे रोहित पवार नाराज असल्याचे बोलले जात आहे. त्यात त्यांनी या बैठकीला दांडी मारल्याने नाराजीच्या चर्चेला उधाण आले आहे. तर पक्षाचे नेते शशिकांत शिंदे यांनी बैठकीबाबत पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे.

शशिकांत शिंदे म्हणाले, फार मोठ्या उमेदीने पक्ष पुढे नेण्यासाठी सर्वांचा सहभाग असावा, त्यात खासदार असतील, आमदार असतील, ज्यांनी निवडणुका लढवल्या आहेत त्या सगळ्यांना बरोबर घेऊन आणि सगळ्यांनी वेळ देऊन पक्षात पूर्णपणे महाराष्ट्रात शरद पवारांच्या नेतृत्वाखाली सक्षम विरोधी पक्ष म्हणून आम्ही उभा करण्याच्या संदर्भात बैठकीत चर्चा झाली. या बैठकीत सर्वच कार्यकर्ते, पदाधिकारी, आमदार तसेच खासदारांनी आपापली भूमिका मांडली आहे. तसेच हे आधी स्पष्ट करतो की विलीनीकरणाचा हा विषय संपलेला आहे. यापुढे विलीनीकरणाबाबत कुठलीही चर्चा होणार नाही. आम्ही सक्षमपणे (पान ४ वर)

# संगणक क्रांतीचे जनक - राजीव गांधी

राजीव गांधी (२० ऑगस्ट इ.स. १९४४ - २१ मे इ.स. १९९१) हे भारताचे सातवे पंतप्रधान होते. इंदिरा गांधी आणि फिरोज गांधी यांचे ते ज्येष्ठ पुत्र होते. राजीव गांधी हे नेहरू घराण्यातले तिसरे पंतप्रधान होते. इंदिरा गांधीच्या निधनानंतर ३१ ऑक्टो. इ.स. १९८४ ते २ डिसे. इ.स. १९८९ पर्यंत ते भारताचे पंतप्रधान होते. जेव्हा राजीव गांधीनी पंतप्रधान पदाची सूत्रे हातात घेतली तेव्हा ते भारताचे सर्वांत तरुण पंतप्रधान बनले. (वय ४० वर्षे)

राजीव गांधी राजकारणात येण्यापूर्वी इंडियन एअरलाइन्समध्ये वैमानिक होते. आई इंदिरा गांधी या भारताच्या पंतप्रधान असल्या तरी त्यांनी मात्र राजकारणातून दूर राहणे पसंत केले होते. दरम्यान इंग्लंडमधील केंब्रिज येथे असतांना त्यांची ओळख इटालियन वंशाच्या सोनियाशी झाली व पुढे त्यांचा विवाह झाला. अखेर इ.स. १९८० मध्ये भाऊ संजय गांधी याच्या निधनानंतर राजीवने राजकारणात प्रवेश केला. पुढे आई इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर ते इ.स. १९८४ मध्ये पंतप्रधान बनले.

राजीव गांधीच्या नेतृत्वात काँग्रेसने त्यानंतर झालेल्या १९८४ च्या लोकसभा निवडणुकांत ५४२ पैकी ४११ जागा जिंकत दणदणीत विजय मिळवला. राजीव गांधीच्या आधुनिक विचारांचा पगडा त्यांच्या सुधारणावादी कामांतून पहायला मिळाला. संगणकयुगाची त्यांनी भारताला ओळख करून दिली. तसेच टेलिकॉमच्या क्रांतीची सुरूवात ही त्यांच्या धोरणांतून झाली.

इ.स. १९८८ मध्ये त्यांनी श्रीलंकेत शांतिसेना पाठविण्याचा निर्णय घेतला. त्याची परिणती लिट्टेसोबतच्या संघर्षात झाली. याच सुमारास बोफोर्स घोटाळ्यात त्यांच्यावर झालेल्या आरोपांनी त्यांची स्वच्छ राजकारण्याची प्रतिमा मलिन झाली. अखेर इ.स. १९८९ च्या लोकसभा निवडणुकांत त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

राजीव गांधी त्यानंतरही काँग्रेसच्या अध्यक्षपदावर कायम होते. इ.स. १९९१ च्या लोकसभा निवडणुकात एका प्रचार सभेच्या वेळी त्यांची लिट्टेकडून हत्या करण्यात आली. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी सोनिया गांधी, मुलगा राहुल गांधी व मुलगी प्रियंका गांधी या राजकारणात आहेत. राजीव गांधी यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सुरुवातीचे आयुष्य - राजीव गांधीचा जन्म भारताच्या सर्वांत प्रसिद्ध राजकीय घराण्यात झाला. आजोबा जवाहरलाल नेहरू भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख नेते आणि भारताचे पहिले पंतप्रधान होते. जवाहरलाल नेहरू यांची मुलगी इंदिरा यांनी काँग्रेसचे एक सदस्य फिरोज गांधी (हे धर्माने पारशी होते) यांच्या सोबत विवाह केला. इंदिरा गांधीनी इ.स. १९४४ मध्ये राजीव गांधीना जन्म दिला. याकाळात त्यांचे आईवडील स्वातंत्र्य लढयातील सहभागामुळे सतत तुरुंगात असत. अखेर इ.स. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते अलाहाबाद येथे स्थायिक झाले. पण इ.स. १९४९च्या सुमारास इंदिरा व फिरोज यांच्यात दुरावा निर्माण झाला. व इंदिरा मुलांसकट पित्याकडे दिल्लीला परतल्या व पुढेही पित्यासोबतच रहिल्या. इ.स. १९६० मध्ये फिरोज गांधींचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

राजीव गांधीचे सुरुवातीचे शिक्षण बोर्डिंग स्कूल मध्ये झाले. इ.स. १९६१ ला पुढील शिक्षणासाठी ते लंडनला गेले. केंब्रिजमध्ये असताना इ.स. १९६५ च्या जानेवारीत त्यांची ओळख इटलीच्या एन्टोनीया माईनो (अहूदहग श्रग्हद - सोनिया गांधी) यांच्याशी झाली. पुढे इ.स. १९६८ मध्ये त्यांनी भारतात येऊन त्या दोघांनी विवाह केला. इ.स. १९६७ मध्ये आई इंदिरा या भारताच्या पंतप्रधान बनल्या तरी राजीव राजकारणापासू दूर रहात इंडियन एअरलाइन्समध्ये वैमानिक म्हणून रुजू झाले.त्यांना इ.स. १९७० मध्ये राहुल तर इ.स. १९७२ मध्ये प्रियांका ही दोन अपत्ये झाली.

इ.स. १९८० मध्ये लहान भाऊ संजय गांधी राजकारणात सक्रिय होता त्याचा विमान अपघातात मृत्यु झाला. यानंतर आई आणि काँग्रेस पक्ष यांच्याकडून राजीव यांच्यावर राजकारणात उतरण्यासाठी दबाब येऊ लागला. राजीव व सोनिया दोघांचा राजकारणात येण्यास विरोध होताच, तशी जाहीर व्यक्तव्ये राजीवनी केली होती. तरी पुढे विचार बदलून इ.स. १९८१ मध्ये त्यांनी अमेठी येथून लोकसभा निवडणूक लढवली. त्यांनी लोकदलचे उमेदवार शरद यादव यांचा २ लाख मताधिक्याने पराभव केला. लवकरच ते आईचे प्रमुख सल्लागार तसेच युवक काँग्रेसचे प्रमुख बनले.

३१ ऑक्टोंबर इ.स. १९८४ रोजी इंदिराजींची हत्या झाली. राजीव गांधीवर पंतप्रधान पदाची जबाबदारी सोपवण्यात आली. इंदिराजींची हत्या झाल्यावर दिल्लीत शीख विरोधी दंगली उसळल्या. सुमारे २७०० शीख यात मारले गेले. याबाबत काँग्रेस नेत्यांवर दंगली भडकवण्याचे आरोपही झाले. याबाबत दिल्लीत एका समारोहात राजीवगांधी काढलेले उद्गार पुढील प्रमाणे.

'Some riots took place in the country following the murder of Indiraji. We know the people were very angry and for a few days it seemed that India had been shaken. But, when a mighty tree falls, it is only natural that the earth around it does shake a little.'

जेव्हा मोठे झाड पडते तेव्हा आजुबाजुची जमीन हादरणे सहाजिकच आहे. या व्यक्तव्यावरून राजीव गांधीवर प्रचंड टीका झाली. पंतप्रधानपदी निवड होताच राजीव गांधीनी लोकसभा बरखास्त करत निवडणुका घेतल्या. मोठया बहुमताने काँग्रेस निवडून आली. त्यांच्या स्वच्छ प्रतिमेचा त्यांना फायदा झालाच. त्यांनी रशिया सोबतचे मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ केले तसेच अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि चीन यांसोबतही चांगले संबंध बनवण्याचे प्रयत्न केले.

आर्थिक धोरणे - राजीव गांधीनी तंत्रज्ञानसंबंधी क्षेत्रात आयातीवर सूट दिली. खासकरुन संगणक, दूरसंचार क्षेत्र यात त्यांनी खास प्रयत्न केले. लायसन्स राज संपवण्याचा प्रयत्न करत त्यांनी आयातीचे नियम शिथिल केले.

इ.स. १९९१ मध्ये लोकसभा निवडणुकांचा प्रचारसभे दरम्यान लिट्टे ने मानवी बॉम्बचा वापर करून राजीव गांधींची हत्या केली. 'धनु' नावाची मुलगी राजीव गांधींच्या सभास्थानी स्वागतासाठी जमलेल्या गर्दीत होती. राजीव गांधी जवळ येताच ती गर्दीतून पुढे येण्याचा प्रयत्न करू लागली. तेव्हा राजीव गांधींच्या महिला सुरक्षारक्षकने तिला अडविले. पण राजीव गांधींनी त्या महिला रक्षकाला थांबवून धनूला जवळ येऊ दिले. धनु राजीव गांधींच्या पाया पडण्यास वाकली आणि तिने आपल्या कमरेला असणारी स्फोटके उडवून दिली. यात तिचा, राजीव गांधींचा आणि जवळ उभ्या असणाऱ्या व्यक्तींचा मृत्यू झाला. लिट्टेने सुरवातीस जबाबदारी घेण्यास नकार दिला पण घटणास्थळाचे चित्रीकरण उपलब्ध झाल्यावर, इतर दहशतवाद्यांची ओळख पटवून माग घेण्यात आला. यामुळे लिट्टेने भारताची उरली सुरली सहानुभुती तर गमावलीच शिवाय लिट्टेला दहशतवादी संघटना म्हणून घोषित करणारा भारत पहिला देश ठरला. याचे अनुकरण करत ३२ देशांनी लिट्टेला दहशतवादी घोषित केले.

बॉम्ब स्फोटात २१ मे १९९१ रोजी राजीवजी या स्फोटात गतप्राण झाले. दहशतवादाशी लढणारा नव्या संगणक युगाचा जनक तरूण व होतकरू पंतप्रधान आम्हास सोडून निघून गेला त्यांच्या अमरस्मृतींना कोटी कोटी प्रणाम..

# दहशत व हिंसा यांमुळे मानवी जीवन प्रभावित

**दहशतवादाची** शिकार झालेल्या बांधवांची कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त होतात. अनेक लोकांना प्राण गमवावे लागतात. एकूणच राष्ट्राची व शेवटी जागतिक सुरक्षितता व शांतता भंग पावते. आजच्या स्थितीला संपूर्ण जगात ज्या-ज्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यापैकी सर्वात मोठी व अवघड समस्या म्हणजे दहशतवाद व हिंसाचार आहे. या समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न श्री एन. के. कुमार, से.नि.अध्यापक हे सदर लेखातून करत आहेत... संपादक.

दहशतवादाचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. त्यामुळे हा प्रश्न कोणत्याही एका देशाचा नाही. दहशतवाद जगात सर्वत्र वेगाने पसरत आहे. त्यामुळे जागतिक शांततेला धोका निर्माण झाला आहे. मे १९९१मध्ये काँग्रेस पक्षाच्या प्रचारादरम्यान तामिळनाडू राज्यातील श्रीपेरंबुदुर येथे सभेला संबोधित करत असताना दहशतवाद्यांनी भारताचे दिवंगत माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या घडवून आणली. या घटनेचे औचित्य साधून २१ मे हा दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून पाळला जातो. याच दिवशी त्यांची पुण्यतिथी असते. हाच दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून संपूर्ण देशात व जगातही पाळला जातो. या देशाचे सर्वात तरुण पंतप्रधान म्हणून त्यांनी सन १९८४ ते सन १९८९पर्यंत काम पाहिले. संपूर्ण जगात शांतता प्रस्थापित व्हावी व अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचावा तसेच देशासाठी दहशतवाद विरोधात लढर्णाया हजारो सैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करणे, भावी पिढीला मूलगामी प्रभावापासून वाचविणे, त्यांच्या मनामध्ये देशाच्या प्रगतीसाठी, संरक्षणासाठी जागरुकता निर्माण करणे, हे देखील या दिवसाचे उद्देश आहेत. या मानवनिर्मित उपद्रवी कृत्यांची जॉन क्रेटम यांनी अशी व्याख्या केली- आपल्या राजकीय मागण्या जबरदस्तीने मान्य करून घेण्यासाठी विशिष्ट समूहात आत्यंतिक भीती निर्माण करण्याच्या हेतूने एखादी व्यक्ती किंवा गट यांनी प्रस्थापित सत्तेच्या बाजूने किंवा विरोधात चालविलेला हिंसाचार किंवा निर्माण केलेला धाक म्हणजे दहशतवाद होय.

आज सर्व जगच दहशतीच्या छायेखाली सापडलेले असून कोणत्या ठिकाणी कधी हल्ला होईल? याची सततची टांगती तलवार प्रत्येकाच्या डोक्यावर लटकत असते. कोणता मनुष्य आज सुरक्षित आहे, हे खात्रीपूर्वक सांगणे कठीण झालेले आहे. मुंबई, दिल्लीसारख्या मोठ्या शहरातील माणूस सकाळी घराबाहेर पडला, तर संध्याकाळी तो सुखरूप घरी परतेल का? याची खात्री देता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. भारतातील दहशतवादाचा विचार केला, तर अनेक वेळा दहशतवादी हल्ले झालेले आहेत. मग तो मुंबई लोकल ट्रेनमधील साखळी बॉम्ब हल्ला असेल, सीएसटी. रेल्वेस्टेशनवर तसेच हॉटेल ताज, हॉटेल ओबेरॉय येथील हल्ला असेल. या देशाचा मानबिंदू म्हणून ज्याकडे आदराने पाहिले जाते; त्या पवित्र संसदेवर देखील अतिरेक्यांनी हल्ला केला. तसेच उरी वा पुलवामा येथे सीआरपीएफ जवानांच्या गाड्यांच्या ताफ्यावर झालेला हल्ला असेल, असे वर्षानुवर्षे दहशतवादी प्रवृत्ती हल्ले करत आहे. जम्मू-काश्मीर येथे नियमित असे हल्ले होत आहेत. त्यामुळे हजारो निरपराध नागरिक, कर्तव्यावरील भारतीय सैनिक पोलीस दल यांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

विशेषतः दहशतवादाचे स्वरूप असे असू शकते- संघटित, नियोजित व हिंसात्मक कृती करणे, राजकीय हेतूने प्रेरित होणे, बळजबरी व धमक्या देण्यासाठी शस्त्रांचा वापर करणे, लक्ष्य हे निवडक आणि निश्चित असणे, लोकशाही विरोधी कृत्य घडविणे, मानवीहक्कांचा भंग करणे. याच गोष्टी स्थानिक ते वैश्विक स्वरूप धारण करू शकतात. यास कारणीभूत काही ढोबळ कारणे अशी: १) आंतरराष्ट्रीय कारणे- राजनैतिक मार्गाने उद्दिष्टे साध्य होत नाहीत म्हणून शत्रू राष्ट्रावर मात करण्यासाठी दहशतवाद अंगीकारला जातो. मूलतत्त्ववादी व धार्मिक कट्टरवादी हे दहशत निर्माण करून आपल्या उद्दिष्टांचा व धार्मिक तत्त्वांचा अंगीकार करू इच्छितात. छोट्या राष्ट्रांना बड्या राष्ट्रांबरोबर युद्ध करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने दहशतवादाचा मार्ग त्यांना फायदेशीर वाटतो. लष्करी सामर्थ्य वाढविण्यापेक्षा दहशतवादास पाठिंबा देणे सोपे असते. उदाहरणार्थ- पाकिस्तानचा काश्मीरमध्ये चालू असलेला सरकार पुरस्कृत दहशतवाद. वाढते नागरिकीकरण व शहरीकरण यामुळे होणारा त्रास. २) सामाजिक कारणे- बेकारी, सामाजिक असुरक्षिततेची भावना, सुसंवादाचा अभाव, दुसऱ्याबद्दल संकुचित वृत्ती व स्पर्धात्मक भावना ठेवणे. ३) आर्थिक कारणे- दारिद्र्य, लुटारू वृत्ती व पैशाची हाव, अमली पदार्थाची तस्करी, आर्थिक विषमता तसेच विकासातील विषमता, काळा पैसा आदी. ४) राजकीय कारणे- सत्ताकांक्षा, शासनाची उदासीन प्रवृत्ती व फुटीरवादी चळवळीस प्रोत्साहन, सरकारकडून अपेक्षाभंग, राजकीय बजबजपुरी इत्यादी. ५) तांत्रिक कारणे- अत्याधुनिक शस्त्रे व साधने यांची सहज उपलब्धता, आधुनिक दळणवळण सुविधा व प्रगत संदेशवहन सहज शक्य होणे आदी. ६) इतर कारणे- लोकशाही व्यवस्थेचा अभाव, असहिष्णुता, धार्मिक व वंशिक विद्वेष इत्यादी सांगता येतील.

या व अशा उपद्व्यापामुळे मानवास भोगावे लागणारे दुष्परिणाम असे- दहशतवादामुळे सामाजिक तसेच राष्ट्राच्या सुरक्षिततेची भावना धोक्यात येते. संरक्षणावरील खर्च वाढून राष्ट्राच्या विकासाची गती मंद होते. दहशतवादी कारवायांमुळे राष्ट्राच्या संपत्तीचे अतोनात नुकसान होते. राष्ट्राच्या विकासाकडे दुर्लक्ष होते. दहशतवादाची शिकार झालेल्या बांधवांची कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त होतात. अनेक लोकांना प्राण गमवावे लागतात. एकूणच राष्ट्राची व शेवटी जागतिक सुरक्षितता व शांतता भंग पावते. आजच्या स्थितीला संपूर्ण जगात ज्या-ज्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यापैकी सर्वात मोठी व अवघड समस्या म्हणजे दहशतवाद व हिंसाचार आहे. या दहशतवादामुळेच संपूर्ण जगाची शांतता भंग पावली आहे. फार मोठ्या प्रमाणावर सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्येने देशाची फार मोठी आर्थिक हानी केलेली आहे. दहशतवाद व हिंसाचार याचे मूळ हे धार्मिक महत्त्वाकांक्षेत आहे. आपला धर्म हा सर्वात श्रेष्ठ आहे. त्या धर्माचा प्रचार व प्रसार व्हावा, हा यामागील सर्वात मोठा हेतू आहे. त्यासाठी अत्यंत विषारी आणि विखारी प्रचार मोठ्या प्रमाणावर केला जातो, म्हणून दहशतवाद निर्माण करणारी देशभर पसरलेली केंद्रे संपवणे व धर्मांधतेला प्रोत्साहन देर्णाया संस्था, संघटनांची दुकाने बंद करणे आवश्यक आहे. झटपट श्रीमंती, वजनदारपणा, अधिकार व सत्ता हस्तगत लोलुपता याही गोष्टींना हाणून पाडणे आवश्यक राहील. यासाठी जनतेने जागरूक राहून वागले पाहिजे.

!! जागतिक दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन सप्ताहनिमित्ताने सर्वांना दक्षतावर्धक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन -

**श्री एन. के. कुमार,**
से.नि.अध्यापक.गडचिरोली,
मोबा- ७७७५०४१०८६.

# दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाज : काळाची गरज

**२१ मे १९९१** रोजी तामिळनाडूमधील श्रीपेरंबुदूर येथे निवडणूक प्रचारसभेदरम्यान झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटात त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता. त्या घटनेनंतर भारत सरकारने समाजात दहशतवाद आणि हिंसाचाराविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी २१ मे हा दिवस 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचा उद्देश केवळ एका नेत्याच्या स्मृतींना अभिवादन करणे नाही, तर समाजामध्ये शांतता, बंधुता, सहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे हा आहे. आजच्या अस्थिर आणि तणावपूर्ण जगात या दिवसाचे महत्त्व अधिक वाढलेले दिसून येते.




मानवजातीच्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असता संघर्ष, युद्धे आणि हिंसा यांचे अनेक संदर्भ आढळतात. प्राचीन काळात भूभाग विस्तारासाठी युद्धे केली जात होती. मध्ययुगात धर्माच्या नावाखाली रक्तपात झाला. आधुनिक युगात राष्ट्रवाद, आर्थिक विषमता, राजकीय स्वार्थ, धार्मिक कट्टरता आणि जातीयवादामुळे हिंसाचाराला खतपाणी मिळाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जगाला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेले असले, तरी मानवी मनातील द्वेष, सूडभावना आणि असहिष्णुता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. उलट आधुनिक तंत्रज्ञानामुळे दहशतवाद अधिक संघटित, आक्रमक आणि घातक बनला आहे. आज दहशतवादी संघटना इंटरनेट, सोशल मीडिया, आर्थिक नेटवर्क आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या मदतीने जगभरात भयाचे वातावरण निर्माण करत आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ एका देशापुरता मर्यादित प्रश्न राहिलेला नसून संपूर्ण मानवजातीसमोरील गंभीर आव्हान बनला आहे.

दहशतवाद म्हणजे राजकीय, धार्मिक, सामाजिक किंवा वैचारिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हिंसा, धमकी आणि भीतीचा वापर करणे होय. दहशतवादी संघटना समाजामध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी निरपराध नागरिकांना लक्ष्य करतात. बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले, गोळीबार, अपहरण, रेल्वे किंवा विमानांवरील हल्ले, धार्मिक स्थळांवरील आक्रमणे आणि सायबर हल्ले अशा विविध मार्गांनी दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जातात. हिंसाचार ही केवळ शारीरिक हानीपुरती मर्यादित गोष्ट नाही. मानसिक, सामाजिक आणि वैचारिक स्तरावरही हिंसा घडू शकते. एखाद्याला धमकावणे, द्वेष पसरवणे, अफवा निर्माण करणे किंवा समाजात भीतीचे वातावरण तयार करणे हे देखील हिंसेचेच प्रकार आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ सुरक्षाव्यवस्थेचा प्रश्न नसून तो सामाजिक, मानसिक आणि नैतिक मूल्यांशी संबंधित गंभीर विषय आहे.

भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला देश आहे. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य मानले जाते. मात्र, काही विघातक शक्तींनी या विविधतेचा गैरफायदा घेऊन देशामध्ये अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने अनेक दहशतवादी घटनांचा सामना केला आहे. पंजाबमधील अतिरेकी चळवळी, जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, ईशान्य भारतातील फुटीरतावादी कारवाया, नक्षलवाद आणि महानगरांमधील बॉम्बस्फोट अशा अनेक घटनांनी देश हादरून गेला. १९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोट, २००१ मधील भारतीय संसदेवरील हल्ला, २००८ मधील मुंबईवरील २६/११ चा दहशतवादी हल्ला आणि पुलवामा हल्ला अशा घटनांमध्ये शेकडो निरपराध नागरिक, सैनिक आणि पोलिस शहीद झाले. या घटनांमुळे समाजामध्ये भीती, असुरक्षितता आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले.

दहशतवादाची कारणे अनेक प्रकारची आहेत. गरिबी, बेरोजगारी, अशिक्षण, सामाजिक अन्याय, धार्मिक कट्टरता, जातीय भेदभाव, राजकीय अस्थिरता आणि परकीय हस्तक्षेप ही दहशतवाद वाढण्याची प्रमुख कारणे मानली जातात. समाजातील काही युवक जेव्हा स्वतःला उपेक्षित समजू लागतात, तेव्हा त्यांच्या मनामध्ये असंतोष निर्माण होतो. काही अतिरेकी संघटना अशा युवकांना चुकीच्या मार्गाला लावतात. धर्म, राष्ट्रवाद किंवा स्वातंत्र्याच्या नावाखाली त्यांचे ब्रेनवॉश केले जाते. काही वेळा आर्थिक आमिष दाखवूनही युवकांना दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी केले जाते. सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या माध्यमातून अतिरेकी विचारसरणीचा प्रचार मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे युवकांमध्ये विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावादी मूल्ये विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. हिंसाचाराचा परिणाम अत्यंत भयावह असतो. दहशतवादी हल्ल्यांमध्ये निरपराध लोकांचे प्राण जातात, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि हजारो लोक मानसिक आघात सहन करतात. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू म्हणजे त्या संपूर्ण कुटुंबाचा आधार हरवणे होय. लहान मुले अनाथ होतात, महिलांचे संसार उद्ध्वस्त होतात आणि वृद्ध व्यक्ती आधारविना राहतात. हिंसेमुळे समाजामध्ये भीती आणि अविश्वास वाढतो. लोक सार्वजनिक ठिकाणी जाण्यास घाबरतात. शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, रेल्वे स्थानके आणि धार्मिक स्थळे असुरक्षित वाटू लागतात. दहशतवादी घटनांचा मानसिक परिणामही गंभीर असतो. अनेक लोकांना दीर्घकाळ तणाव, नैराश्य आणि भीतीचा सामना करावा लागतो.

दहशतवादाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही गंभीर परिणाम होतो. एखाद्या मोठ्या हल्ल्यानंतर पर्यटन, उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक यांवर विपरीत परिणाम होतो. सरकारला सुरक्षा व्यवस्थेसाठी प्रचंड खर्च करावा लागतो. विकासकामांसाठी वापरला जाणारा निधी सुरक्षेसाठी खर्च होतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग मंदावतो. दहशतवादी घटनांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची प्रतिमा प्रभावित होऊ शकते. त्यामुळे दहशतवाद हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून राष्ट्रीय विकासासाठीही मोठे आव्हान आहे. आजच्या डिजिटल युगात सायबर दहशतवाद हे नवे संकट बनले आहे. इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून सरकारी यंत्रणा, बँकिंग व्यवस्था आणि संप्रेषण प्रणालीवर हल्ले केले जाऊ शकतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरवणे, धार्मिक तेढ निर्माण करणे आणि समाजात अस्थिरता निर्माण करणे हे प्रकार वाढले आहेत. काही वेळा खोटी माहिती आणि द्वेषपूर्ण संदेशांमुळे दंगली आणि हिंसाचार भडकतो. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांनी कोणतीही माहिती तपासल्याशिवाय पुढे पाठवू नये. डिजिटल साक्षरता ही आजच्या काळाची गरज बनली आहे. दहशतवाद आणि हिंसाचार रोखण्यासाठी शिक्षण अत्यंत प्रभावी माध्यम ठरू शकते. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच शांतता, सहिष्णुता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण केली पाहिजे. शिक्षणामुळे विवेकशीलता विकसित होते आणि युवक चुकीच्या प्रवृत्तीं पासून दूर राहतात.

शाळा आणि महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, मानवता आणि सामाजिक जबाबदारी यांवर आधारित उपक्रम राबविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी विविध धर्म, संस्कृती आणि विचारांचा आदर करण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे.

भारत देशात महात्मा गौतम बुद्ध, भगवान महावीर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला अहिंसेचा महान संदेश दिला. सत्य, प्रेम आणि शांततेच्या माध्यमातून संघर्ष सोडविण्याचा मार्ग त्यांनी दाखवून दिला. गांधीजींच्या मते हिंसा तात्पुरता विजय मिळवून देऊ शकते; परंतु दीर्घकालीन शांतता आणि मानवतेचे रक्षण केवळ अहिंसेतूनच शक्य आहे. आजच्या काळात गांधीजींचे विचार अधिक महत्त्वाचे वाटतात. हिंसेला हिंसेने उत्तर दिल्यास द्वेष वाढतो; परंतु संवाद, सहकार्य आणि समजूतदारपणातून समाजात सलोखा निर्माण होतो. कुटुंब व्यवस्थेची भूमिकाही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुलांमध्ये नैतिक मूल्ये, सहनशीलता, परस्पर आदर आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कार्य कुटुंबातूनच सुरू होते. पालकांनी मुलांच्या वर्तनाकडे लक्ष देणे, त्यांच्याशी संवाद साधणे आणि योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. आज अनेक युवक सोशल मीडियाच्या प्रभावाखाली येतात. चुकीच्या विचारसरणीचा प्रभाव पडू नये यासाठी कुटुंबातील वातावरण सकारात्मक असणे गरजेचे आहे. युवकांना योग्य दिशा मिळाली तर ते राष्ट्रनिर्मितीत महत्त्वाचे योगदान देऊ शकतात.

माध्यमांची जबाबदारी देखील अत्यंत महत्त्वाची आहे. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सोशल मीडिया यांच्या माध्यमातून समाजात जागरूकता निर्माण करता येते. मात्र, काही वेळा सनसनाटी वृत्तांकनामुळे समाजात भीती आणि तणाव वाढतो. त्यामुळे माध्यमांनी जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने बातम्या सादर करणे आवश्यक आहे. समाजात शांतता, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पोहोचविणे ही माध्यमांची सामाजिक जबाबदारी आहे.

भारत सरकार आणि विविध सुरक्षा यंत्रणा दहशतवाद रोखण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. सैन्यदल, पोलिस, गुप्तचर संस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा देशाच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र कार्यरत असतात. सीमावर्ती भागांमध्ये सुरक्षा मजबूत करण्यात आली आहे. दहशतवादी कारवायांवर नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर कायदे करण्यात आले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरही विविध देश एकत्र येऊन दहशतवादाविरोधात सहकार्य करत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने दहशतवादाला जागतिक शांततेसाठी गंभीर धोका मानले आहे. धर्म हा मुळात प्रेम, करुणा आणि मानवतेचा संदेश देतो. कोणताही धर्म हिंसा शिकवत नाही. परंतु काही कट्टरवादी शक्ती धर्माचा चुकीचा अर्थ लावून लोकांना भडकवतात. त्यामुळे धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. विविध धर्मांचे लोक एकत्र येऊन शांतता आणि बंधुभावाचा संदेश देतील, तर समाज अधिक मजबूत होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय संविधानाने सर्व धर्मांना समान आदर दिला आहे. 'सर्वधर्मसमभाव' ही भारतीय संस्कृतीची परंपरा आहे. या मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये दहशतवादविरोधी शपथ, व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध स्पर्धा, रॅली आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक जाणीव आणि शांततेची भावना निर्माण होते. युवकांनी संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवून शांततेच्या मार्गाने समस्या सोडविण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे. युवक हे राष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांच्यामध्ये अपार ऊर्जा आणि क्षमता आहे. ही ऊर्जा सकारात्मक दिशेने वळिवणे अत्यंत आवश्यक आहे. महिलांची भूमिकाही शांतता प्रस्थापित करण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. आई, शिक्षिका, समाजकार्यकर्त्या आणि नेतृत्वकर्त्या म्हणून महिला समाजात संवेदनशीलता आणि सहकार्याची भावना निर्माण करू शकतात. अनेक महिलांनी समाजात शांतता मोहिमा राबवून सकारात्मक परिवर्तन घडवून आणले आहे. महिलांना शिक्षण, स्वावलंबन आणि निर्णयप्रक्रियेत समान सहभाग मिळाल्यास समाज अधिक स्थिर आणि प्रगत होतो. भारतीय संस्कृतीने जगाला 'वसुधैव कुटुंबकम्'चा संदेश दिला आहे. संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे, ही भावना भारतीय तत्त्वज्ञानात आढळते. प्रेम, करुणा, सहिष्णुता आणि मानवता हीच खरी संस्कृती आहे. हिंसा आणि द्वेष यातून केवळ विनाश निर्माण होतो; तर शांतता आणि सहकार्य यातून प्रगतीचा मार्ग खुला होतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने समाजात शांतता टिकवून ठेवण्यासाठी योगदान दिले पाहिजे. दहशतवाद आणि हिंसाचार विरोधी दिन हा केवळ औपचारिकता म्हणून साजरा करण्याचा दिवस नाही. हा दिवस आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. आपण समाजात शांतता आणि बंधुभाव वाढविण्यासाठी काय योगदान देत आहोत, याचा विचार या निमित्ताने करणे आवश्यक आहे. हिंसा ही समस्या सोडविण्याचा मार्ग नाही, हे समाजाने समजून घेतले पाहिजे. मतभेद असू शकतात; परंतु ते संवाद, लोकशाही आणि संविधानिक मार्गाने सोडविले पाहिजेत. आज जगासमोर शांततेचे मोठे आव्हान उभे आहे. युद्धे, धार्मिक संघर्ष, जातीय हिंसा, दहशतवाद आणि सायबर गुन्हे यांमुळे मानवता धोक्यात आली आहे. अशा परिस्थितीत जागतिक बंधुभाव, सहकार्य आणि शांततेची भावना अधिक मजबूत करण्याची गरज आहे. विविध देशांनी परस्पर सहकार्याने दहशतवादाविरोधात एकत्रित लढा दिला पाहिजे. मात्र, खरी शांतता तेव्हाच निर्माण होईल जेव्हा प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये मानवतेबद्दल आदर आणि प्रेम निर्माण होईल. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी नागरिकांनीही सतर्क राहणे आवश्यक आहे. संशयास्पद हालचालींबाबत प्रशासनाला माहिती देणे, सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा नियमांचे पालन करणे आणि समाजात सलोखा टिकवून ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. देशभक्ती म्हणजे केवळ घोषणाबाजी नसून समाजात शांतता, एकता आणि सद्भावना टिकवून ठेवणे होय. भारत हा शांतता, लोकशाही आणि सहिष्णुतेवर विश्वास ठेवणारा देश आहे. अनेक संकटांनंतरही भारताने लोकशाही आणि राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवली आहे. हे भारतीय समाजाच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. विविधतेत एकता जपणारा भारत जगासाठी आदर्श ठरू शकतो. मात्र, त्यासाठी समाजातील द्वेष, असहिष्णुता आणि हिंसक प्रवृत्ती दूर करणे आवश्यक आहे. २१ मे रोजी साजरा होणारा दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन आपल्याला शांततेचा, मानवतेचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देतो. या दिवशी आपण सर्वांनी हिंसेचा त्याग करून प्रेम, सहकार्य आणि बंधुभावाचा मार्ग स्वीकारण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. शिक्षण, सामाजिक न्याय, आर्थिक विकास, नैतिक मूल्ये आणि मानवतेच्या माध्यमातूनच दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाजाची निर्मिती शक्य आहे. अहिंसा, सत्य, बंधुता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि समृद्ध होऊ शकतो. त्यामुळे दहशतवाद आणि हिंसाचाराविरोधात एकजुटीने उभे राहून शांततामय, सुरक्षित आणि सुसंस्कृत भारत घडविणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# नीट पेपरफुटी : शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरचा घाला

**देशातील** लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा निर्णय ठरवणारी आणि वैद्यकीय शिक्षणाचे प्रवेशद्वार मानली जाणारी नीट परीक्षा आज गंभीर संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा केवळ एक शैक्षणिक प्रक्रिया नसून आयुष्य घडवणारा टप्पा असतो. परंतु, या परीक्षेत झालेल्या कथित पेपरफुटी, गुणांमधील संशयास्पद वाढ, परीक्षा केंद्रांवरील गैरव्यवस्था आणि संगनमताच्या आरोपांनी देशातील शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हताच डळमळीत केली आहे. ही केवळ एका परीक्षेची चूक नाही तर हा देशातील शिक्षण व्यवस्थेच्या नैतिक अधः पतनाचा आणि सरकारी यंत्रणांच्या अपयशाचा गंभीर इशारा आहे.

आजच्या काळात स्पर्धा परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी युद्धभूमीच बनली आहे. लाखो विद्यार्थी दोन-दोन, तीन-तीन वर्षे कठोर परिश्रम करून नीटची तयारी करतात. अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून, शेतकरी कुटुंबातून, आर्थिकदृष्ट्या कम कुवत परिस्थितीतून पुढे येतात. काहींचे पालक शेती विकतात, काही कर्ज काढतात, तर काही स्वतःच्या गरजा कमी करून मुलांच्या शिक्षणासाठी पैसा खर्च करतात. विद्यार्थीदेखील मित्र, मनोरंजन, सण-उत्सव यापासून दूर राहून दिवसाचे १२ ते १४ तास अभ्यास करतात. अशा वेळी जर प्रश्नपत्रिका परीक्षा सुरू होण्यापूर्वीच बाजारात विकली जात असेल, तर मेहनतीवर उभ्या असलेल्या व्यवस्थेचा पाया कोसळल्याशिवाय राहत नाही.




नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरातील विद्यार्थ्यांच्या मनात एक धोकादायक प्रश्न निर्माण केला आहे, मेहनत करून खरंच यश मिळते का? हा प्रश्न केवळ भावनिक नाही तर तो शिक्षण व्यवस्थेच्या अस्तित्वाशी संबंधित आहे. जेव्हा पैशांच्या जोरावर प्रश्नपत्रिका मिळवणारे विद्यार्थी प्रामाणिक विद्यार्थ्यांपेक्षा पुढे जातात, तेव्हा गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि स्पर्धेतील समान संधी या लोकशाही मूल्यांचाच पराभव होतो. गरीब विद्यार्थी अभ्यास करतो आणि श्रीमंत व्यवस्था विकत घेतो, अशी भावना समाजात निर्माण होणे ही अत्यंत धोकादायक बाब आहे.

या प्रकरणात राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. देशातील सर्वात महत्त्वाच्या परीक्षांपैकी एक असलेल्या नीट सारख्या परीक्षेची प्रश्नपत्रिका सुरक्षित ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरत असेल, तर ही बाब सामान्य नाही. डिजिटल इंडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, बायोमेट्रिक तंत्रज्ञान अशा आधुनिक सुविधांचा गजर करणाऱ्या देशात परीक्षा सुरक्षेतील एवढी मोठी त्रुटी कशी राहू शकते? प्रश्नपत्रिका छपाईपासून वितरणापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत जर गोपनीयता राखली जाऊ शकत नसेल, तर यंत्रणेत खोलवर भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणा शिरल्याचे स्पष्ट होते.

या संपूर्ण घोटाळ्यामागे केवळ काही विद्यार्थी किंवा दलाल नसून एक संघटित रॅकेट कार्यरत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही तपासांत दलाल, कोचिंग क्लासेस, स्थानिक अधिकारी आणि राजकीय संरक्षण असलेल्या टोळ्यांचे संगनमत असल्याचे आरोप समोर आले. शिक्षण हे ज्ञान, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे क्षेत्र असताना त्याला बाजारपेठ बनवण्याचा उद्योग सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. वैद्यकीय शिक्षणात प्रवेश मिळवण्यासाठी लाखो नव्हे तर कोट्यवधी रुपयांचे व्यवहार होतात, अशा चर्चा उघडपणे होत आहेत. ही परिस्थिती देशासाठी अत्यंत चिंताजनक आहे. कारण उद्या जर पैशाने प्रवेश मिळवलेले विद्यार्थी डॉक्टर बनले, तर त्याचा परिणाम केवळ शिक्षणापुरता मर्यादित राहणार नाही; तो थेट जनतेच्या आरोग्यावर होणार आहे.

पेपरफुटी प्रकरणाचा सर्वात गंभीर परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होत आहे. स्पर्धा परीक्षांचे दडपण आधीच प्रचंड असते. त्यात परीक्षा रद्द होईल का, पुन्हा परीक्षा घ्यावी लागेल का, निकालावर परिणाम होईल का, या अनिश्चिततेमुळे लाखो विद्यार्थी मानसिक तणावाखाली आले आहेत. अनेक विद्यार्थी नैराश्य, चिंता आणि भीती अनुभवत आहेत. देशाने यापूर्वी स्पर्धा परीक्षांच्या तणावामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्याही पाहिल्या आहेत. त्यामुळे अशा घटनांकडे केवळ प्रशासकीय किंवा कायदेशीर मुद्दा म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. ही पिढीच्या मानसिक सुरक्षिततेची बाब आहे. दुर्दैवाने, अशा गंभीर विषयांवरही राजकारण सुरू होते. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात व्यस्त असतात पण विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबत ठोस भूमिका घेणारे फार कमी दिसतात. संसदेत गदारोळ होतो, पत्रकार परिषदांत आरोप होतात, चौकशांच्या घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात दोषींना शिक्षा होण्याची प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबते. त्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनात ङ्गमोठे लोक वाचतात आणि सामान्य विद्यार्थी भरडले जातातङ्ख अशी भावना निर्माण होते. ही भावना लोकशाहीसाठी घातक आहे.

भारतात पेपरफुटीचे प्रकार नवीन नाहीत. विविध राज्यांतील भरती परीक्षा, पोलीस भरती, शिक्षक भरती, एमपीएससी, रेल्वे परीक्षा अशा अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये यापूर्वीही गैरप्रकार उघड झाले आहेत. म्हणजेच समस्या केवळ एका संस्थेपुरती मर्यादित नाही; ती संपूर्ण प्रणालीतील भ्रष्टाचार आणि कमकुवत नियंत्रण यंत्रणेची आहे. शिक्षण आणि रोजगाराच्या संधी कमी असताना स्पर्धा वाढते, आणि त्यातूनच गैरप्रकारांचे जाळे अधिक मजबूत होत जाते. बेरोजगारी आणि स्पर्धेच्या भीषण दडपणात अडकलेल्या समाजात परीक्षा ही काहींसाठी व्यवसाय बनते, हे वास्तव नाकारता येणार नाही.

या परिस्थितीत सरकारने केवळ आश्वासने देऊन चालणार नाही. कठोर आणि परिणाम कारक उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम परीक्षा प्रक्रियेला पूर्णपणे तंत्रज्ञानाधारित आणि पारदर्शक बनवणे गरजेचे आहे. प्रश्नपत्रिकांची छपाई, वाहतूक आणि वितरणासाठी एंड-टू-एंड डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली लागू करावी. प्रत्येक टप्प्यावर जबाबदारी निश्चित करावी. परीक्षा केंद्रांवर बायोमेट्रिक पडताळणी, एआय-आधारित निरीक्षण, सायबर सुरक्षा आणि स्वतंत्र नियंत्रण कक्ष यांची अंमलबजावणी केली पाहिजे. प्रश्नपत्रिका गळतीसारख्या गुन्ह्यांना दहशतवादी किंवा आर्थिक गुन्ह्यांइतकीच गंभीर वागणूक देऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. याशिवाय, परीक्षा घेणाऱ्या संस्थांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्यासाठी कायम स्वरूपी स्वायत्त प्राधिकरण निर्माण करणे आवश्यक आहे. राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त आणि न्यायालयीन अधिकार असलेली स्वतंत्र यंत्रणा उभारली गेली तरच अशा प्रकरणांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल. चौकशी समित्यांच्या घोषणा करून प्रकरण दडपण्याची जुनी पद्धत आता थांबली पाहिजे. दोषींना जलदगती न्यायालयांतून शिक्षा झाली तरच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसेल.

विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचाही विचार तितकाच महत्त्वाचा आहे. शिक्षण म्हणजे केवळ गुणांची स्पर्धा नाही, तर व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे, हा संदेश

समाजात पोहोचवणे गरजेचे आहे. पालकांनी मुलांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे टाकू नये. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अपयश स्वीकारण्याची ताकद द्यावी. सरकारने प्रत्येक जिल्ह्यात समुपदेशन केंद्रे सुरू करून स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना म ानसिक आधार उपलब्ध करून द्यावा. कारण परीक्षा महत्त्वाची असली तरी विद्यार्थ्यांचे जीवन त्याहून अधिक महत्त्वाचे आहे.

आज गरज आहे ती शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्याची. विद्यार्थी जर व्यवस्थेवरच विश्वास ठेवेनासे झाले, तर देशाच्या प्रगतीचा पाया हादरेल. शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणा, गुणवत्ता आणि समान संधी टिकवून ठेवण्यासाठी सरकार, न्यायव्यवस्था, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. अन्यथा ङ्गमेहनतीपेक्षा पैशाला महत्त्वङ्ख ही मानसिकता अधिक बळावेल आणि समाजातील नैतिक मूल्यांचे अधःपतन वेगाने वाढेल. नीट पेपरफुटी प्रकरण हे एका परीक्षेपुरते मर्यादित नाही; ते भारताच्या शिक्षण व्यवस्थेसमोर उभे राहिलेले आरसे आहे. त्या आरशात भ्रष्टाचार, निष्काळजीपणा, राजकीय हस्तक्षेप आणि व्यवस्थेतील ढासळलेली नैतिकता स्पष्ट दिसत आहे.

या आरशाकडे डोळेझाक करून चालणार नाही. कारण आज जर विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना रोखले नाही, तर उद्या देशाच्या भविष्यालाच मोठी किंमत मोजावी लागेल.

**- प्रवीण बागडे**

# पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिकांना हिंदुस्थानी नागरिकत्वासाठी पासपोर्टची माहिती देणे बंधनकारक; गृह मंत्रालयाचा नवा नियम

नवी दिल्ली, दि. २० (वृत्तसंस्था) - पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशमधून येऊन हिंदुस्थानचे नागरिकत्व मिळवू इच्छिणाऱ्या लोकांसाठी गृह मंत्रालयाने एक नवा आणि महत्त्वाचा नियम जारी केला आहे. 'टीव्ही९ भारतवर्ष'ने दिलेल्या वृत्तानुसार, गृह मंत्रालयाने सोमवारी शेजारील देशांतील नागरिकांना हिंदुस्थानचे नागरिकत्व मिळवून देण्याबाबत एक नवा आदेश जारी केला आहे.

मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, जे लोक नागरिकत्व नियम, २००९ (Citizenshpi Rules, 2009) अंतर्गत हिंदुस्थानी नागरिकत्व मि ळवू इच्छितात, त्यांना आता त्यांच्या मूळ देशाच्या पासपोर्टच्या स्थितीबद्दल सविस्तर माहिती देणे अनिवार्य असणार आहे.

काय आहे नवीन नियम ?

गृह मंत्रालयाने नागरिकत्व नियम, २००९ मध्ये एक महत्त्वाचा बदल करत एक नवीन परिच्छेद जोडला आहे. या नव्या नियमानुसार, अर्जदाराकडे पाकिस्तान, अफगाणिस्तान किंवा बांगलादेश सरकारच्या वतीने जारी करण्यात आलेला कोणताही वैध किंवा मुदत संपलेला पासपोर्ट नसावा.

पासपोर्टची माहिती देणे बंधनकारक

शासकीय अधिसूचनेत नमूद केल्याप्रम ाणेः जर अर्जदाराकडे कोणताही सक्रिय पासपोर्ट असेल, तर त्या व्यक्तीला पासपोर्ट नंबर, तो जारी केल्याची तारीख, ठिकाण आणि त्याच्या मुदत समाप्तीची तारीख यासह इतर सर्व तपशील देणे आवश्यक आहे.

तसेच, नागरिकत्वाचा अर्ज मंजूर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अर्जदाराला आपला वैध किंवा मुदत संपलेला पासपोर्ट संबंधित पोस्टाचे वरिष्ठ अधीक्षक किंवा पोस्ट अधीक्षकांकडे सुपूर्द करावा लागेल आणि त्याबाबतची माहिती देखील द्यावी लागेल.

२०१९ च्या कायद्यात मोठा बदल

हा नवीन नियम अनुसूची खउ (डलहशर्वीश्रश खउ) नंतर जोडला जाईल. ही अनुसूची प्रामुख्याने पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमधून आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारसी आणि ख्रिश्चन धर्मीय नागरिकांसाठी आहे, जे हिंदुस्थानचे नागरिकत्व मिळवू इच्छितात. जर अर्जदाराकडे का ेणताही सक्रिय पासपोर्ट असेल, तर त्या व्यक्तीला पासपोर्ट नंबर, तो जारी केल्याची तारीख, ठिकाण आणि त्याच्या मुदत समाप्तीची तारीख यासह इतर सर्व तपशील देणे आवश्यक आहे.

तसेच, नागरिकत्वाचा अर्ज मंजूर झाल्यापासून १ ५ दिवसांच्या आत अर्जदाराला आपला वैध किंवा मुदत संपलेला पासपोर्ट संबंधित पोस्टाचे वरिष्ठ अधीक्षक किंवा पोस्ट अधीक्षकांकडे सुपूर्द करावा लागेल आणि त्याबाबतची माहिती देखील द्यावी लागेल.

२०१९ च्या कायद्यात मोठा बदल

हा नवीन नियम अनुसूची IC (Schedule IC) नंतर जोडला जाईल. ही अनुसूची प्रामुख्याने पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमधून आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारसी आणि ख्रिश्चन धर्मीय नागरिकांसाठी आहे, जे हिंदुस्थानचे नागरिकत्व मिळवू इच्छितात.

# शेवटी मराठी म्हणजे : मऊ भात, मेतकूट आणि साजूक तूप!

**लिंबाचं** लोणचं, पोह्याचा पापड, ताकातला डांगर, वरण-फळं, आणि म ोदकांच्या उरलेल्या उकडीच्या केलेल्या फक्त शेवटच्या पंगतीत मिळणाऱ्या त्या तिखट, चमचमीत निवागऱ्या!

डब्यात दिलेली पोळीची गुंडाळी, गुळतूप पोळी, लोणी-साखर पोळी, आणि नावडती भाजी असली की आज्जीनं कालवून दिलेलं केळ्याची शिकरण. बाहेरगावी फिरून, थकून-भागून घरी पोहोचल्यावर, रात्री जेवायला काहीही नको असं वाटत असताना आईच्या आग्रहास्तव खाल्लेला पहिल्या वाफेचा वरणभातः आणि पहिला घास घेताच डोळे मिटून दिसलेलं ते सुख!

शेवटी मराठी म्हणजेः ठकठक, चंपक, चंदामामा आणि चिंटू-मिनीच्या गमतीजम ती!

दिवाळी अंकासाठी वर्षभर पाहिलेली वाट आणि हाती येताच झालेला तो इवल्याशा हृदयात न मावणारा आनंदः

दुपारच्या वेळी ऐकलेल्या छान छान गोष्टीच्या कॅसेट्स आणि चेटकीणीची गोष्ट येताच घाबरून बंद करून टाकलेला तो टेप रेकॉर्डर! शेवटी मराठी म्हणजेः व. पु. काळे, शिरीष कणेकर आणि सुहास शिरवळकर!

एका बैठकीत वाचलेले स्वामी, श्रीम ान योगी, राधेय आणि अशा कितीतरी कादंबऱ्याः एखाद्या लेखकाचे शब्द आपला आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतात ही अनुभवलेली किमया!

**शेवटी मराठी म्हणजे** : अशी ही बनवा बनवीचं केलेलं पारायण आणि ओम फट्ट स्वाहाम्हणताच तोंडपाठ असलेला ओम भगानी भगोदरीः हा तात्या विंचूचा चित्रविचित्र मंत्र!

शेवटी मराठी म्हणजे : नववी-दहावीत असताना ऐकलेले चितळे मास्तर आणि अंतू बर्वा. कोणीतरी पोट दुखेपर्यंत हसवता हसवता चटकन रडवूही शकतो याचा झालेला तो साक्षात्कार. त्या वल्लीला 'पु. ल. दैवत' असं का म्हणतात याची पदोपदी झालेली ती जाणीव!

शेवटी मराठी म्हणजे : आभाळमाया, वादळवाट आणि अवंतिका! रात्री शाळेचं दप्तर भरत असताना आणि आई उद्याची भाजी निवडत असताना, बाबांनी हळूच रिमोट घेऊन लावलेल्या साडेनऊच्या आजच्या ठळक बातम्या!

टिपरे परिवारासोबत मोठं होताना, हल्लीच आलेला 'दशावतार' पाहून दिलीप प्रभावळकरांबद्दल वाटलेलं ते भलतंच अप्रूप, आश्चर्य आणि आदर!

शेवटी मराठी म्हणजेः

बालभारती!

बहिणाबाई, बोरकर, कुसुमाग्रज, ग्रेस, शांताबाई शेळके यांच्या अजूनही चालीसह लक्षात असलेल्या कविता. बाईंनी तोंडपाठ करून घेतलेली श्रावणमासी हर्ष मानसी गर्दीत कुठूनतरी कानावर पडताच आपलं कोणी तरी ओळखीचं आहे इथे, हा मिळालेला एक दिलासा!

शेवटी मराठी म्हणजेः

लोकसत्ताची रविवारची पुरवणी!

चतुरंग मधले प्रवीण दवणे आणि गौतम राजाध्यक्षांचे लेख, आणि दुपारच्या वेळी सोडवत बसलेले भलेमोठे शब्दकोडे!

शेवटी मराठी म्हणजेः

नाट्यदैवतांना वंदन करून तिसरी घंटा वाजताच उघडलेला तो पडदाः आणि त्यानंतर तीन तास शब्दांत न मांडता येणारा तो जादुई अनुभव!

सुयोग प्रस्तुत, विजय केंकरे दिग्दर्शित, दोन अंकी नाटकङ्ग ङ्ख हे शब्द कानावर पडताच आता आपल्याला कमाल काहीतरी बघायला मिळणार ही खात्रीः आणि पोटात न मावणारा तो आनंद!

**शेवटी मराठी म्हणजेः**

लता दीदी, आशा ताई, बाबूजी यांची अजरामर गाणी आणि मराठी शब्दांना लाभलेलं ते एक सुरेल असं वरदान!

मराठी रसिकांना एक साधा-सोपा कविता आणि गाण्यांचा कार्यक्रम हाऊस फुल कसा होऊ शकतो हे दाखवून देणारे सलील आणि संदीप दादा!

शेवटी मराठी म्हणजे :

सकाळी उठताच सवयीने तोंडी येणारं कराग्रे वसते लक्ष्मी : संध्याकाळी शुभंकरोती झाल्यावर आजोबांसोबत झोपाळ्यावर बसून ऐकलेली ती रामरक्षा आणि आज्जीनं लावलेला तो अंगारा!

**शेवटी मराठी म्हणजे** : 'माझी शाळा', माझा आवडता प्राणी, मला पंख असते तर! यावर लिहिलेले ते मजेशीर निबंध!

'निबंध' शब्द ऐकताच कित्येक वर्षांत मराठी लिहिलंच नाही ही झालेली बोचरी जाणीव : मराठी 'टाईप' करता करता ती मुळाक्षरं स्वतःच्या अक्षरात कशी दिसतात याचा पडत चाललेला विसरः आणि वाटलेली थोडीशी ती लाज...

# सेवानिवृत्त नायब तहसीलदार रमेश भालेराव यांचे निधन

वैजापूर, दि. २० (प्रतिनिधी) - येथील रहिवासी व तहसील कार्यालय व उपजिल्हाधिकारी कार्यालयातून सेवा निवृत्त होऊन चार वर्षे झालेले नायब तहसीलदार रमेश श्याम राव भालेराव यांचे बुधवार (ता.२०) रोजी सकाळी आठ वाजता हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. ते ६२ वर्ष वयाचे होते त्यांच्या पार्थिवावर बुधवार रोजीच दुपारी २.०० वाजता अमर धाममध्ये अंतिम संस्कार करण्यात आले.



या प्रसंगी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, नगरसेवक लिमेश वाणी, सोनू राजपूत, अशोक पवार खंडाळकर, भगवानसिंह राजपूत, रामचंद्र पिलदे, डॉ.अश्विन जोशी, प्रमोद कुलकर्णी, राजू मेढे, हरीश लालसरे,धोंडीरामसिंह राजपूत, श्री पुंड, दीपक त्रिभुवन, अरुण कुलकर्णी, देविदास देशपांडे, गिरीश भालेराव, महेश शिंदे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. कै. रमेश भालेराव पश्चात पत्नी तसेच विवाहित मुलगा व मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. येथील नगर पालिकेत भांडार विभागात सहाय्यक असलेले दत्ता भालेराव यांचे ते बंधू होतं.

# अणुऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्र नेतृत्वासाठी सज्ज; अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी)- कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर, सेमीकंडक्टर, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे आगामी काळात स्थिर व अखंड वीजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. केवळ सौर आणि पवन उर्जेवर दीर्घकालीन औद्योगिक विकास शक्य नसून अणुऊर्जा (न्यूक्लिअर पॉवर) ही भविष्यातील औद्योगिक अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची ठरणार आहे. महाराष्ट्र अणुऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनाचे नेतृत्व करण्यास तयार असून अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

यूएस न्यूक्लिअर एक्झिक्यूटिव्ह मिशन इन इंडिया अंतर्गत आयोजित न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूट आणि युएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशीप फोरमच्या बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बैठकीस ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबलगन, महाजनकोचे मुख्य कार्यकारी अधिकारी राधाकृष्णन बी., मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांदे यांच्यासह अमेरिकेतील न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मारिया ग्रेस कोर्सनिक, सेंट्रस एनर्जीचे उपाध्यक्ष डॅन लिस्टिको, क्लीन कोअर थोरियम एनर्जीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मेहुल शाह, न्यूक्लिअर कर्टिस-राइट कॉर्पोरेशनचे उपाध्यक्ष गॅरी वोल्स्की, यूएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरमच्या व्यवस्थापकीय संचालक निवेदिता मेहरा, एडलो इंटरनॅशनल कंपनीचे अध्यक्ष जॅक एडलो, तसेच होल्टेक एशियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि धोरणात्मक भागीदारी प्रमुख अनंत जैन यांच्यासह विविध अमेरिकन कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जगभरात ऊर्जा संक्रमणाच्या प्रक्रियेत मोठे बदल होत आहेत. गेली अनेक वर्षे सौर आणि पवन ऊर्जा ही नवीकरणीय ऊर्जा हीच भविष्यातील ऊर्जा समस्या सोडवेल, अशी धारणा होती. मात्र आता वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे स्थिर व सातत्यपूर्ण वीज निर्मितीची गरज प्रकर्षाने जाणवत आहे. महाराष्ट्र सौर आणि पवन उर्जेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत असला तरी कार्बनमुक्त आणि औद्योगिक स्तरावरील बेसलोड ऊर्जा पुरवठ्यासाठी न्यूक्लिअर ऊर्जा अत्यावश्यक ठरणार आहे. महाराष्ट्र हा ६६० अब्ज डॉलर अर्थव्यवस्थेचा देशातील अग्रगण्य औद्योगिक राज्य असून भारतातील एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्क्यांहून अधिक गुंतवणूक महाराष्ट्रात येते. मुंबई आणि नवी मुंबई परिसरात देशातील जवळपास ६० टक्के डेटा सेंटर क्षम ता केंद्रित आहे. आगामी काळात सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता, लॉजिस्टिक्स आणि प्रगत उत्पादन क्षेत्रामुळे वीजेची मागणी अनेक पटींनी वाढणार आहे.

भारत-अमेरिका नागरी अणुऊर्जा सहकार्याबाबत गेल्या काही वर्षांत अनेक सकारात्मक बदल झाले असून खासगी क्षेत्राचा सहभाग, 'शांती' फ्रेमवर्कअंतर्गत सुधारणा, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि औद्योगिक सहकार्यामुळे नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. भारत हा आगामी अनेक दशकांत वेगाने वाढणारी वीज मागणी असलेला देश ठरणार असून महाराष्ट्र हा त्यातील सर्वात मोठा औद्योगिक घटक ठरणार आहे. भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राच्या पुढील प्रवासात महाराष्ट्र केंद्रस्थानी ठरणार असून महाराष्ट्राला केवळ आयात केलेल्या अणुभट्ट्यांचा ग्राहक म्हणून नव्हे, तर न्यूक्लिअर उत्पादन, तंत्रज्ञान भागीदारी आणि जागतिक निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्याचा निर्धार आहे. यासाठी राज्याकडे सक्षम औद्योगिक यंत्रणा, जागतिक दर्जाची बंदरे, लॉजिस्टिक सुविधा, तांत्रिक कौशल्य असलेले म नुष्यबळ, अभियांत्रिकी क्षमता आणि उद्योगपूरक धोरणे उपलब्ध असल्याचे श्री. फडणवीस यांनी नमूद केले.

अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात न्यूक्लिअर उत्पादन व प्रकल्प उभारणीसाठी पुढाकार घेतल्यास राज्य सरकारकडून औद्योगिक जमीन, पायाभूत सुविधा, कौशल्य विकास, संशोधन सहकार्य आणि उत्पादन क्लस्टर उभारणीसाठी मदत केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. सुरुवातीच्या टप्प्यातील उद्योगांसाठी अनुदान आणि विशेष सवलती देण्याची तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले. छोट्या स्वरुपातील स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर्स क्षेत्रातही महाराष्ट्र प्रारंभीचे केंद्र बनण्यास उत्सुक असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या भविष्यातील गरजांशी एसएमआर तंत्रज्ञान सुसंगत असून पुढील पिढीच्या न्यूक्लिअर उर्जेसाठी महाराष्ट्र आदर्श प्रयोगभूमी ठरू शकतो, असे त्यांनी नमूद केले. भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध आता तंत्रज्ञान, संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पुरवठा साखळी या क्षेत्रांत अधिक मजबूत होत आहेत. नागरी अणुऊर्जा सहकार्य हे या भागीदारीच्या पुढील टप्प्यातील निर्णायक क्षेत्र ठरू शकते. न्यूक्लिअर ऊर्जा ही केवळ वीज निर्मिती नसून औद्योगिक स्पर्धात्मकता, तांत्रिक नेतृत्व, ऊर्जा सार्वभौमत्व, हवामान बदलाची जबाबदारी आणि दीर्घकालीन विश्वासाशी संबंधित विषय असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

श्रीमती मारिया कोर्सनिक यांनी भारतामध्ये न्यूक्लिअर ऊर्जा क्षेत्रात मोठी संधी असल्याचे नमूद केले. महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ, औद्योगिक तंत्रज्ञान आणि सप्लाय चेन असल्याने येथे गुंतवणुकीची म ोठी संधी असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील वाढती ऊर्जेची गरज, सध्याची निर्मिती क्षम ता आणि भविष्यात न्यूक्लिअर उर्जे ची आवश्यकता याविषयी माहिती दिली. राज्यातील सध्याची वीज मागणी ३१ गिगावॅट असून २०३० पर्यंत ती ४२ गिगावॅटपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. राज्यात सौर ऊर्जा, बॅटरी स्टोरेज, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा संक्रमणासाठी मोठ्या प्रमाणावर प्रकल्प राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्राने नूतनीकरणक्षम ऊर्जेत मोठी प्रगती केली असून २०३५ पर्यंत राज्याच्या ६५ टक्के ऊर्जेची गरज नूतनीकरणक्षम स्रोतांतून पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. भविष्यातील वाढती ऊर्जा गरज लक्षात घेता अणुऊर्जा हे राज्याचे पुढील महत्त्वाचे उद्दिष्ट असून त्यासाठी राज्याने तयारी सुरू केल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

महाजनकोचे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी यांनी म हाजनकोतर्फे सुरू असलेल्या विविध ऊर्जा प्रकल्पांचा आढावा सादर केला. पुढील दोन दशकांत ७ हजार मेगावॅट अणुऊर्जा निर्मितीचे लक्ष्य निश्चित केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सध्या १४.५ गिगावॅट क्षमतेची देशातील सर्वात मोठी राज्य सरकारी वीजनिर्मिती कंपनी म्हणून महाजनको कार्यरत आहे. ऊर्जा क्षेत्रातील बदल लक्षात घेता कोळसा आधारित उत्पादनाऐवजी अणुऊर्जेवर भर दिला जात आहे. राज्यातील औद्योगिक परिसरांच्या गरजेनुसार स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर तंत्रज्ञानाचा वापर करण्याचाही विचार सुरू आहे.

स्टील, सिमेंट, खत उद्योग आणि डेटा सेंटर्सना अशा प्रकल्पांमधून ऊर्जा पुरवली जाऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

यूएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरमच्या व्यवस्थापकीय संचालक निवेदिता मेहरा यांनी प्रास्ताविकात बैठकीची पार्श्वभूमी विशद केली.यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराष्ट्रातील अणुऊर्जा क्षेत्र, त्यातील सुविधा व गुंतवणुकीची संधी याविषयी मते मांडली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# सरन्यायाधीशांनी तरूणाईला झुरळ म्हटल्यानंतर छत्रपती संभाजीनगरच्या 'झुरळा'ने स्थापन केली 'कॉक्रोच जनता पार्टी', तीनच दिवसांत मिळाले २० लाखांहून अधिक सदस्य!

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका खटल्याच्या सुनावणीवेळी ज्या बेरोजगार तरूणांची 'झुरळ' (कॉक्रोच) म्हणून संभावना केली, त्याच बेरोजगार तरूणांपैकी एका तरूणाने 'कॉक्रोच जनता पार्टी' (सीजेपी) ही व्यंगात्मक राजकीय चळवळ सुरू केली असून ही चळवळ सुरू झाल्यानंतर अवघ्या तीनच दिवसांत २० लाखांहून अधिक सदस्यांनी या चळवळीत सहभाग नोंदवला आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणीच्या वेळी देशातील बेरोजगार तरूणांची झुरळाशी तुलना केल्यामुळे देशात वाद सुरू झालेला असतानाच अभिजीत दिपके या छत्रपती संभाजीनगरच्या तरूणाने १६ मे रोजी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर 'सर्व झुरळांसाठी एक नवीन व्यासपीठ सुरू करत आहोतष्ठ तुम्हाला सामील व्हायचे असल्यास खालील लिंकवर क्लिक करा. पात्रतेचे निकषः बेरोजगार, आळशी, सतत ऑनलाइन असणारे, व्यावसायिकपणे आपले मत मांडण्याची क्षमता,' अशी पोस्ट करत लोकांना 'कॉक्रोच जनता पार्टी' जॉइन करण्याचे निमंत्रण देणारा गुगल फॉर्म शेअर केला. अभिजीत दिपके या तरूणाने सुरू केलेल्या या व्यंगात्मक राजकीय चळवळीला पाहता पाहता देशातील जेन-झीने प्रचंड प्रतिसाद दिला आणि अवघ्या तीनच दिवसांत कॉक्रोच जनता पार्टीला २० लाखांहून अधिक सदस्य मिळाले.

जे इंटरनेटवर एक विनोद म्हणून सुरू झाले होते, त्याचे रुपांतर आता एका पूर्ण विकसित व्यंगात्मक ऑनलइन चळवळीत झाले आहे. कोणतीही नोंदणी नसलेल्या या 'अनधिकृत पार्टी'ने अवघ्या तीनच दिवसांत म्हणजे २० मेपर्यंत २० लाखांहून अधिक सदस्य नोंदणीचा टप्पा ओलंडला. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी नंतर आपल्या विधानावर स्पष्टीकरण दिले असले तरी कॉक्रोच जनता पार्टीचा जलवा जेन-झी मनावर गारूड करायचे थांबला नाही. या पार्टीच्या इंस्टाग्राम पेजवर ४० लखांहून अधिक फॉलोअर्स आहेत तर एक्सवर एक लाखाहून अधिक फॉलोअर्स मिळाले आहेत.

कॉक्रोच जनता पार्टीने स्वतःची वेबसाईटही तयार केली आहे. या वेबसाईटवर एक नजर टाकल्यास या राजकीय व्यंगात्मक चळवळीचे व्हिजन आणि मिशन पहायला मिळते. 'आम्ही दुसरा पीएम केअर्स फंड सुरू करण्यासाठी, करदात्यांच्या पगारावर दावोसमध्ये सुट्टी घालवण्यासाठी किंवा भ्रष्टाचाराला 'धोरणात्मक खर्च' नवीन नाव देण्यासाठी आलेलो नाही. 'पैसा कुठे गेला?' हे आम्ही येथे आम्ही मोठ्याने, वारंवार, लेखी स्वरुपात विचारण्यासाठी आलो आहोत. व्यवस्था ज्यांची मोजदाद करायलाच विसरली अशा लोकांचे आम्ही प्रतिनिधित्व करतो, असा दावा 'आळशी बेरोजगारांचा आवाज' अशी टॅगलाइन असलेल्या कॉक्रोच जनता पार्टी करते. शून्य प्रायोजक आणि पाच मागण्यांसह 'एक मोठा जिद्दी थवा' अशी ही पार्टी आपली ओळख सांगते.

**'कॉक्रोच'चा पाच कलमी जाहिरनामा**

व्यंगात्मक राजकीय चळवळ म्हणून जन्माला आलेल्या कॉक्रोच जनता पार्टीने आपला पाच कलमी जाहिरनामाही प्रसिद्ध केला आहे. राजकीय उत्तदायित्व, माध्यमांवरील नियंत्र, स्त्री-पुरूष प्रतिनिधीत्व आणि निवडणूक सुधारणा या सारख्या महत्वाच्या मुद्द्यांना या जाहिरनाम्यात स्पर्श करण्यात आला आहे. तो पाच कलमी जाहिरनामा असाः




कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी) सत्तेत आल्यास कोणत्याही सरन्यायाधीशांना सेवानिवृत्तीनंतरचे बक्षीस म्हणून राज्यसभेची जागा दिली जाणार नाही.

नागरिकांचा मतदानाचा हक्क हिसकावून घेणे हे दहशतवादापेक्षा कमी नसल्यामुळे सीजेपी किंवा विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यात कोणतेही वैध मत वगळण्यात आले तर मुख्य निवडणूक आयुक्तांना 'यूएपीए'अंतर्गत अटक केली जाईल.

संसदेचे संख्याबळ न वाढवता महिलांना ३३ टक्क्यांऐवजी ५० टक्के आरक्षण दिले जाईल. शिवाय सर्व कॅबिनेट मंत्रीपदांपैकी ५० टक्के पदे महिलांसाठी राखीव असतील.

खऱ्या अर्थाने माध्यम स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा करून देण्यासाठी अंबानी आणि अदानी यांच्या मालकीच्या सर्व माध्यम संस्थांचे परवाने रद्द केले जातील. गोदी मीडियाच्या अँकर्सच्या बँक खात्यांची चौकशी केली जाईल.

एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाणाऱ्या कोणत्याही आमदार किंवा खासदाराला २० वर्षांच्या कालवधीसाठी निवडणूक लढण्यास आणि कोणतेही सार्वजनिक पद धारण करण्यास बंदी घालण्यात येईल.

**कोण आहे अभिजीत दिपके?**

कॉक्रोच जनता पार्टीचा संस्थापक आणि संयोजक अभिजीत भगवानराव दिपके हा ३० वर्षीय तरूण मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगरच्या वाळूजचा आहे. त्याचे वडिल अभियंता आहेत. अभिजीतने पुण्यातून त्याने ब्रॉडकॉस्ट जर्नलिझम या विषयात पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. उच्च शिक्षण घेण्यासाठी तो अमेरिकेत गेला आहे. सध्या तो बोस्टन विद्यापीठात जनसंपर्क या विषयात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत आहे. अभिजीत हा पॉलिटिकल कम्युनिकेशन स्ट्रॅटेजिस्ट म्हणजे राजकीय संवाद रणनितीकार आहे. ज्यांचे काम नॅरेटिव्हची निर्मिती करणे, सार्वजनिक संदेशन आणि डिजिटल प्लॅटफॉर्म राजकीय मत कसे घडवतात, यावर केंद्रित आहे.

अभिजीतने २०२० ते २०२३ या काळात आम आदमी पार्टीच्या सोशल मीडिया टीममध्ये स्वयंसेवक म्हणून काम केले आहे. फेब्रुवारी २०२० मध्ये अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील 'आप'ने जिंकलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान त्याने मीम्सआधारित डिजिटल प्रचारावर लक्ष केंद्रित करून काम केले. त्यामुळे आपच्या राजकीय, ऑनलइन आणि युवा सहभागाला आकाराला मिळाला.

अभिजीतचा सहभाग असलेल्या आपच्या सोशल मीडिया टीमने दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपने भिनवलेल्या 'देश के गद्दारों को गोली मारो सालों को' या स्लोगनला 'देश के गवारों को, स्कूल भेजो सारों को' हे सोशल मीडिया कॅम्पेन राबवून भाजपला सडेतोड उत्तर दिले होते.

# सुखना नदी काठावर २५ अतिक्रमण जमीनदोस्त






छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार तसेच अतिक्रमण नियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे आणि उपआयुक्त सविता सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आज मोतीवाला कॉलनी, चिखलठाणा येथील सुखना नदीच्या काठावरील अतिक्रमणांवर महानगरपालिकेने मोठी कारवाई केली. नदीकाठावरील अतिक्रमणे हटविणे ही केवळ प्रशासकीय कारवाई नसून नदीचे अस्तित्व, पर्यावरणीय समतोल आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. सुखना नदी ही शहराच्या नैसर्गिक जल निस्सारण व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असून नदीपात्र आणि नदीकाठावरील अतिक्रमणांमुळे पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह बाधित होऊन पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढतो. तसेच नदीकिनारी अनधिकृत बांधकामांमध्ये वास्तव्यास राहणे हे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण करणारे ठरू शकते. मुसळधार पावसाच्या काळात नदीच्या पाण्याची पातळी अचानक वाढल्यास जीवित व मालमत्तेची हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नदीकाठ अतिक्रमणमुक्त ठेवणे ही काळाची गरज असल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले. सुखना नदीच्या काठावरील अतिक्रमण धारकांना बांधकाम काढून घेण्याबाबत महानगरपालिकेकडून वेळोवेळी सूचना देण्यात आल्या होत्या. या कारवाईत एकूण ३२ अतिक्रमण धारकांचा समावेश होता. त्यापैकी काही नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमण हटविले, तर उर्वरित २५ अतिक्रमण धारकांची बांधकामे महानगरपालिकेकडून निष्कासित करण्यात आली. या कारवाईमध्ये नदीकाठावर उभारण्यात आलेल्या दोन मजली जिमच्या बांधकामाचाही समावेश होता. नदीपात्र आणि नदीकाठावरील अतिक्रमणे हटवून नैसर्गिक प्रवाह सुरळीत ठेवणे, पूराचा धोका कमी करणे आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे या उद्देशाने महानगरपालिका अशा कारवाया पुढेही सातत्याने करणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. सदर कारवाईसाठी झोन क्रमांक ६ चे पदनिर्देशित अधिकारी निलेश पाटणी, इमारत निरीक्षक गणेश वीर, देसाई, सागर तसेच अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत कार्यवाही यशस्वीपणे पार पाडली.

# देशव्यापी केमिस्ट बंद यशस्वी; छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १०० टक्के प्रतिसाद

## जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पंतप्रधानांना निवेदन सादर



छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- आज दिनांक २० मे २०२६ रोजी अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनाच्या आवाहनानुसार देशभरातील केमिस्ट व ड्रगिस्ट बांधवांनी बेकायदेशीर व अनियंत्रित ऑनलइन औषध विक्री तसेच जनआरोग्य व लाखो लहान केमिस्टच्या अस्तित्वाशी संबंधित गंभीर प्रश्नांच्या निषेधार्थ देशव्यापी एकदिवसीय लाक्षणिक बंद यशस्वीरीत्या पाळला.

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटना तसेच महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या आवाहनानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये केमिस्ट व ड्रगिस्ट बांधवांनी आपापली औषध दुकाने पूर्णतः बंद ठेवून आंदोलनास उत्स्फूर्त व एकमुखी पाठिंबा दिला. जिल्हाभरात बंदला मोठा प्रतिसाद मिळाला असून बंद पूर्णपणे यशस्वी ठरला.

या आंदोलनादरम्यान पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नावे निवेदन जिल्हाधिकारी तसेच मा. तहसीलदार यांच्यामार्फत सादर करण्यात आले. सदर निवेदनामध्ये खालील गंभीर मुद्द्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले :

१. औषधांची बेकायदेशीर व अनियमित ऑनलइन विक्री.

२. वैध व तपासणी केलेल्या डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध विक्री व होम डिलिव्हरी.

३. ऑनलाइन औषध विक्री प्लॅटफॉर्मकडून दिल्या जाणाऱ्या अतिशय मोठ्या सवलती मुळे लहान व परवानाधारक केमिस्ट व्यवसायावर होणारा गंभीर परिणाम.

४. ऑनलाइन होणारा औषध पुरवठा फार्मासिस्टच्या निगराणीखाली होत नाही तसेच कोल्ड स्टोरेज आवश्यक असलेली औषधे योग्य तापमान नियंत्रणाशिवाय पाठविली जात असल्याने औषधांची परिणामकारकता कमी होण्याची किंवा पूर्णतः नष्ट होण्याची शक्यता निर्माण होत आहे.

निवेदनामध्ये जीएसआर ८१७ (ई) व जीएसआर २२० (ई) या अधिसूचना तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली. कारण विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्म व क्विक कॉमर्स कंपन्यांकडून या तरतुदींचा गैरवापर करून औषधांची अनियंत्रित डिलिव्हरी केली जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

केमिस्ट व ड्रगिस्ट बांधवांनी यावेळी स्पष्ट केले की, औषधे ही सामान्य उपभोग्य वस्तू नसून योग्य तपासणी व नियमनाशिवाय होणारी ऑनलाइन विक्री ही जनआरोग्य, रुग्ण सुरक्षा तसेच ड्रग्स अँड कॉस्मेटिक्स कायद्यांतर्गत असलेल्या संपूर्ण नियामक व्यवस्थेसाठी गंभीर धोका निर्माण करणारी आहे.

फार्मास्युटिकल व्यवसायाशी संबंधित प्रतिनिधींनी हेही अधोरेखित केले की, कोविड महामारीच्या काळात देशभरातील केमिस्ट बांधवांनी फ्रंटलाइन हेल्थकेअर सपोर्ट म्हणून अखंड सेवा देत जनतेपर्यंत औषधांचा पुरवठा सुरळीत ठेवला होता. मात्र बेकायदेशीर ऑनलइन विक्रीविरोधात वारंवार निवेदने व पुरावे देऊनही संबंधित यंत्रणांकडून प्रभावी कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे रुग्ण सुरक्षा, जनआरोग्य तसेच लाखो लहान परवानाधारक केमिस्ट व त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी केंद्र शासनाने तातडीने प्रभावी व सुधारात्मक पावले उचलावीत, अशी मागणी केमिस्ट समुदायाने केली आहे. महाराष्ट्र स्टेट मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह असोसिएशनचे श्रीकांत फोपसे यांनी यावेळी आंदोलनास पाठिंबा दर्शविणारे पत्र देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. सिल्लोड येथील मोर्चामध्ये स्वतः आमदार तथा माजी मंत्री मा. अब्दुल सत्तार यांनी सहभाग घेऊन आंदोलनास पाठिंबा दिला.

बंद यशस्वी पार पाडण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष नितीन देशमुख, सचिव विनोद लोहाडे, उपाध्यक्ष नंदकिशोर काळे, सहसचिव किरण जोशी, कोषाध्यक्ष निखिल सारडा, बाबुराव सोनवणे, कपिल टिबडीवाला, रईसभाई शेख, हरीश काबरा,सचिन मुगदिया, वसंत भराड, यांच्यासह शेखर गाडे, महावीर दोषी, आशिष भारुका यांचा सक्रिय सहभाग होता.

महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिलचे सदस्य मनोहर कोरे यांनी सक्रिय सहभाग घेऊन प्रशासकीय कामकाजामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली.

तसेच अत्यावश्यक सेवा देण्यासाठी औषधी भवन येथे टास्क फोर्स तयार करण्यात आले होते. त्यामार्फत दिवसभरात २८ रुग्णांना अत्यावश्यक औषधे उपलब्ध करून देण्यात आली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेला बंद पूर्णतः शांततापूर्ण वातावरणात पार पडला असून जिल्ह्यातील केमिस्ट व ड्रगिस्ट समुदायाचा त्यास व्यापक पाठिंबा लाभला. तसेच गरजू रुग्णांसाठी आवश्यक आपत्कालीन औषध सेवा उपलब्ध करून देत संघटनेने आपली सामाजिक व मानवीय जबाबदारीही पार पाडली.

# जागतिक मधमाशी दिनानिमित्त मधु मित्र-मधु सखी पुरस्कार वितरण; मधमाशी पालकांना मार्गदर्शन




छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने मधमाशी पालकांना दिले जाणारे मधुमित्र व मधु सखी पुरस्कारांचे आज वितरण करण्यात आले. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांच्या अध्यक्षतेखाली संत एकनाथ रंग मंदिर छत्रपती संभाजी नगर येथे आज हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण राऊत आणि विशेष अतिथी उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार डांगर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील उपस्थित होते.

खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने जागतिक मधमाशी दिनानिमित्त ' मधु मित्र - मधु सखी ' पुरस्कार एकूण चार सर्वोत्तम आणि चार विशेष सन्मानार्थ पुरस्कार वितरण करण्यात आले. सर्वोत्तम पुरस्कारासाठी लातूरचे ज्ञानेश्वर मलिले, छत्रपती संभाजीनगरचे गणेश बुरकुल , बुलढाण्याचे राजेंद्र दास बैरागी आणि पुण्याच्या श्वेता वायाळ यांची निवड करण्यात आली आहे. तर विशेष सन्मानासाठी ठाण्याचे चंद्रकांत तरे, पुण्याचे संजय मारणे, कोल्हापूरचे दयावान पाटील आणि जळगावचे विद्यानंद अहिरे यांचा समावेश आहे.

मंडळाचे अधिकारी नित्यानंद पाटील विशेष गौरवाने व कर्मचारी वसंत चौधरी, राजू तायडे, योगेश पवार, दिगंबर सूत्रावे, शंकरराव चाटे यांना सन्मानित करण्यात आले. मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण राऊत यांनी शासनाने मंजूर केलेल्या १२ मधाच्या गावातील व इतर मधपाळ यांना मार्गदर्शन करून जागतिक मधमाशी दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

राज्यात मधमाशी पालनाला चालना देण्यासाठी या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे निसर्ग संवर्धन, मध उत्पादन वाढ, स्थानिक रोजगार निर्मिती आणि पर्यटन विकास साध्य होईल. असा विश्वास सभापती रवींद्र साठे यांनी व्यक्त केला.

खादी व ग्राम उद्योग मंडळ गेल्या ६५ वर्षापासून कार्यरत असून विविध रोजगाराभिमुख योजना राबवत आहे. नागरिकांनी ग्रामीण भागातील लघु व मध उद्योजकांनी तयार केलेल्या वस्तू - खादी वस्त्रे ,हातमाग उत्पादने , मधावर आधारित सौंदर्यप्रसाधने, तेल ,साबण , शॅम्पू आदींचा वापर वाढवावा, असे आवाहन यावेळी सभापती रविंद्र साठे यांनी केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात रघुनाथ नारायणकर संचालक मध यांनी शासनाने घोषित केलेल्या १० मधाच्या गावात महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मुंबई मध संचालनालय महाबळेश्वर मार्फत घेण्यात आलेल्या मध उद्योग प्रशिक्षण, मध उद्योगाचे साहित्य वाटप करण्यात आले असल्याची सविस्तर माहिती दिली.तसेच यापुढे मधाच्या गावात मधुबन स्थापना,माहिती दालन, मध उद्योग उत्पादने प्रशिक्षण, व मधाचे ब्रॅण्डिंग मॅपिंग करण्यात येणार असल्याचे आपल्या मनोगतात सांगितले.

## (पान १ वरुन)

(पान १ वरुन)

### न्यायालयाला तानाशाह म्हणणाऱ्या...

विधाने करण्याचे इतर लोक धाडस करू शकतात, असे निरीक्षण खंडपीठाने यावेळी नोंदवले.

न्यायालयाने म्हटले की, आरोपीला कडक शिक्षा न दिल्यास भविष्यात त्याला पुन्हा असे कृत्य करण्यास प्रोत्साहन मिळू शकते. त्यामुळे ही कठोर शिक्षा सुनावण्यात आली आहे. पाहुजा यांनी आपल्या युट्यूबवर 'फाइट फॉर ज्युडिशियल रिफॉर्म' या नावाने एक व्हिडीओ अपलोड केला होता. या व्हिडीओमध्ये पाहुजा यांनी वकील शिव नारायण शर्मा आणि दीपक सिंह यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. या मुलाखतीमध्ये न्यायालय आणि न्यायाधीशांविरोधात बदनामीकारक विधाने केली गेल्याचा आरोप करण्यात येत आहे. तीन न्यायिक अधिकाऱ्यांनी हा व्हिडीओ पाहिल्यानंतर तो दिल्ली उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

### अमेरिकन संसदेत इराण युद्ध...

हे मतदान विरोधी पक्षासाठी एक मोठा विजय मानले जात आहे, ज्यांनी असा युक्तिवाद केला आहे की अमेरिकेत युद्ध सुरू करण्याचा किंवा सैन्य पाठवण्याचा अधिकार अध्यक्षांकडे नसून संसदेकडे असावा. अमेरिकेच्या संविधानातही ही तरतूद आहे. हा प्रस्ताव व्हर्जिनियाचे डेमोक्रॅटिक सिनेटर टिम केन यांनी मांडला होता. चर्चेदरम्यान, ते म्हणाले की युद्धविरामाची चर्चा सुरू असताना, ट्रम्प यांनी काँग्रेससमोर हजर होऊन आपली रणनीती स्पष्ट करावी.

डेमोक्रॅटिक सिनेटर टिम केन यांनी सांगितले की, केवळ राष्ट्राध्यक्षांनाच नव्हे, तर काँग्रेसलाही युद्ध सुरू करण्याचा अधिकार आहे. व्हाईट हाऊसचा दावा आहे की, अमेरिकेच्या सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी ट्रम्प यांनी आपल्या अधिकाराच्या कक्षेत राहूनच कारवाई केली. अमेरिकेच्या कायद्यानुसार, राष्ट्राध्यक्ष काँग्रेसच्या मंजुरीशिवाय केवळ ६० दिवसांसाठी लष्करी कारवाई सुरू करू शकतात. त्यानंतर, त्यांना एकतर युद्ध संपवावे लागते, काँग्रेसची परवानगी घ्यावी लागते, किंवा सैन्याच्या सुरक्षित माघारीसाठी अतिरिक्त ३० दिवसांची मुदत मागावी लागते.

### अमेरिकेने इराणविरोधातील...

काँग्रेशनल रिसर्च सर्व्हिस अमेरिकन काँग्रेस आणि समित्यांना धोरणात्मक आणि कायदेशीर विश्लेषण सेवा प्रदान करते. सीआरएसने, संरक्षण विभाग आणि अमेरिकन सेंट्रल कमांडच्या बातम्या आणि निवेदनांचा अभ्यास करून इराण विरोधातील संघर्षात झालेल्या नुकसानीची माहिती संकलित केली आहे. अमेरिकेला या संघर्षात नुकसानीबरोबर मोठा आर्थिक तोटा देखील झाल आहे. यामुळे अमेरिकेने संरक्षण खर्चात देखील मोठी वाढ केल्याची माहिती समोर आली आहे.

### भारताच्या डोक्यावर आर्थिक...

संपवल्या आहेत. पंतप्रधान मोदी यांनी आता चॉकलेटं वाटत फिरण्याऐवजी शेतकऱ्यांना खतपुरवठा कसा होईल, याकडे पाहायला हवे. अंबानी देशातील तेल बाहेर निर्यात करत आहेत. हे तेल लोकांना हवे आहे. हे तेल जनतेला द्या, असे राहुल गांधी यांनी म्हटले. नरेंद्र मोदी आणि अमित शाह हे दोघेही भारतीय संविधानावर आक्रमण करत आहेत. अदानी, अंबानी यांना देशाची संपत्ती देणे, हे आक्रमण आहे. देशातील विद्यापीठांमध्ये सर्व ठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोकांना कुलगुरुपदी आणून बसवले जात आहे. निवडणूक आयोग आणि न्यायव्यवस्था नष्ट केली जात आहे. अशाप्रकारे संविधानावर आक्रमण करणाऱ्यांना गद्दार म्हणतात. म्हणून मी मोदी-शाह यांना गद्दार म्हणतो. मी त्यासाठी कधीही घाबरत नाही. मी कधी माफी मागणार नाही,मी तुम्हाला घाबरत नाही, असे राहुल गांधी यांनी म्हटले.

### शेतकरी कर्जमाफी ३० जूनपूर्वी...

निर्णय घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकरी कर्जमाफीबाबत योग्य निर्णय घेतील. थकबाकीदार शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळेल. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाईल. येत्या ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होईल.''

विशेष म्हणजे, ही विधानपरिषद निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून होत आहे. यात थेट जनता मतदान करत नसून, जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी मतदान करतात. त्यामुळे या आचारसंहितेचा थेट फटका शासकीय योजनांना बसू नये, अशी रणनीती सरकार आखत असल्याचे दिसते. आचारसंहितेचे सावट असले तरी कृषीमंत्र्यांच्या वक्तव्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आता दिलेल्या शब्दाप्रमाणे सरकार ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांच्या पदरात हे दान कसे टाकते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### राज्यात १ महिना पुरेल एवढाच...

जागतिक इंधन पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्याचा फटका युरोपपासून जपानपर्यंत व अगदी अमेरिकेसारख्या महासत्तेलाही बसला आहे. तिथेही पेट्रोल - डिझेलचे भाव गगनाला भिडलेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी या स्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहेत. इंधनाची आवक सुरुळीत ठेवण्यासाठी ते अनेक नव्या देशांशी संपर्क साधून चर्चा करत आहेत. जागतिक इंधन संकट मोठे आहे. त्यामुळे आपल्यालाही थोडी अडचण सहन करावी लागेल. पण इतर देशांच्या तुलनेत सध्यातरी भारताची परिस्थिती अत्यंत चांगली व नियंत्रणात आहे असे भुजबळ म्हणाले.

### अशोक खरातला ६ दिवसांची...

आले व कुठे गेले? आम्हाला या प्रकरणी अंतिम लाभार्थ्यांपर्यंत पोहोचायचे आहे. या प्रकरणात इतर कुणाचा हात आहे का? याचा शोध घ्यायचा आहे. प्रस्तुत प्कररणात कोणतीही डिपॉझिट स्लिप न भरता कॅशियरच्या मदतीने थेट खात्यात पैसे जमा करण्यात आले.

### राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा...

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष म्हणून हा पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आमच्याकडे एक नेता म्हणून जो चेहरा आहे, तो घेऊन आम्ही महाराष्ट्रात जाणार आहोत. आमदार रोहित पवारांनी माध्यमांशी बोलताना खंत व्यक्त केली होती की आमच्या पक्षातील नेते काम करत नाहीत, यावर प्रश्न विचारला असता शशिकांत शिंदे म्हणाले, आज मी तुम्हाला पक्षाचा अध्यक्ष म्हणून सांगतो, त्यांनी माध्यमांच्या बाहेर काय सांगितले आहे ते मला माहीत नाही. पण मी एक सांगतो आम्ही पक्षाच्या शिस्तीतून आम्ही व्यवस्थित एकत्र काम करू. त्यांच्या काही खंत असतील त्या मी दूर करून भविष्यात आक्रमकपणे आंदोलन करणार आहोत. आम्ही एक शिबिर देखील आयोजित करणार आहोत. आज नीट परीक्षेचा प्रश्न आहे, इंधन दरवाढ आहे, महागाई आहे, या सगळ्या गोष्टींचा विचार करून पक्ष मजबूत करण्यात येणार आहे आणि पक्षाच्या चौकटीमधूनच पुढे जाण्याचा प्रयत्न करणार आहोत असे ते म्हणाले.

# इक्बाल मिरचीची मुंबईतील ५०० कोटींची मालमत्ता जप्त

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- कुख्यात आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्कर इक्बाल मोहम्मद मेमन उर्फ इक्बाल मिरचीची मुंबईतील सुमारे ५०० कोटींची मालमत्ता सक्तवसुली संचालनालयाने तब्बल ३२ वर्षानंतर तात्पुरती जप्त केली. १९९४ मध्ये दाखल असलेल्या विविध गुन्ह्याच्या अनुषंगाने संचालनालयाने ही कारवाई केली असून त्याच्या आणखी काही मालमत्तांचा शोधही जारी केला आहे. याशिवाय मिरची आणि कुटुंबीयांच्या नावावरील दुबईतील २०० कोटींची मालमत्ताही जप्त करण्यात आली आहे. इक्बाल मिरची हा अंमली पदार्थ तस्करीत भारतीय तपास यंत्रणांना हवा होता. मूळचा मुंबईचा असलेल्या मिरचीविरुद्ध मुंबईत अनेक गुन्हे दाखल आहेत.